म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १७४८
१९६६
REFBK-0015560
REFBK-0015560

काव्य
अ.नं. ४४०२८
१३/११/५८
१५४८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४४०२८ दि:
क्रमांक १५४८ नों. दि. काव्य १३/११/५८

समरगीतें, स्फूर्तिगीतें, भक्तिगीतें --

# * रणदुंदुभि *

( भाग पहिला )

- कवि -

बाळ कासेगांवकर.

मूल्य :

— दोन रुपये —

● प्रस्तावना ●

कवि – सुधांशु, औदुंबर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५५६०

REFBK-0015560
REFBK-0015560

कृष्णाखोरे प्रकाशन, कासेगांव,
जि. सांगली. (पुष्प दुसरें)

* प्रथम मुद्रण *
जानेवारी १९६६

* प्रकाशक *
श्री. शंकरराव वीर,
कृष्णाखोरे प्रकाशन, कासेगांव, जि. सांगली.

* मुद्रक *
श्री. दा. शा. मेहता,
जिल्हा परिषद मुद्रणालय, सांगली.

* सजावट *
सॅम आर्ट स्टुडिओ, कोल्हापूर.

* मुखपृष्ठ ब्लॉक *
श्री. के. सी. भिडे, पुणें २

* जाणीव *
सदर संग्रहांतील गीतांच्या पुनर्मुद्रणाचें. भाषांतराचें, ध्वनिक्षेपणाचें, ध्वनिमुद्रणाचें आदि सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन आहेत. त्यासंबंधी लेखकाच्या खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

पत्ता-
बाळ कासेगांवकर, अध्यापक
कासेगांव, ता. वाळवे,
जि. सांगली.

# - समर्पण -



माननीय– यशवंतरावजी चव्हाण

संरक्षणमंत्री यांना-

आ णि . . . .

धारातीर्थी पावन झालें ज्या वीरांचें रक्त
आक्रमकांशी झुंजतात जे भारतभूचे भक्त !
जय जय भारत ! घोष जयांचा भिडतो जाऊन नभीं
त्या वीरांना समर्पीत ही माझी रणदुंदुभि ! !

– बाळ कासेगांवकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नोंद दि ........................

# ✻ आशिर्वाद ✻



माझा एक आवडता नि गुणी विद्यार्थी **बाळ कासेगांवकर** याची **'रणदुंदुभि'** पाहिली. विद्यार्थ्यांना तरुणांना ती सदैव स्फूर्ती देईल, तिचे स्वर ऐकून प्रत्येक तरुणास - जवानास नवचैतन्य येईल, तिच्यांतील जोम नि जोष पाहून मृतात्मेहि महावीर बनतील एवढें सामर्थ्य तिच्यांत प्रत्ययास येतें. बाळची राष्ट्रीय वृत्ती पाहून कौतुक वाटले. रसिक महाराष्ट्र सारस्वतहि त्याचे कौतुक करील असा विश्वास वाटतो.

**कासेगांव कॅंप**
**३।१।१९६६**

**राजारामबापू पाटील,**
**महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य.**

---

# सहर्ष स्वागत !

– बाळ कासेगांवकरांचा **'रणदुंदुभि'** काव्यसंग्रह पाहिला. ही 'रणदुंदुभि' ग्रामीण वातावरणांत जोमानें निनादेल, तिचे स्वर आकाशाला भिडतील. आणि ते स्वर ऐकून खेड्याखेड्यांतील - घराघरांतील जवान वीरश्रीनें चेतून उठतील, शाळा कॉलेजांतील मुलें नवचैतन्यानं प्रेरित होतील आणि महाराष्ट्राचे 'शूर मावळे' आक्रमणाविरुद्ध पेटून उठतील असें वाटतें. कवीनें रणशिंग वेळींच हातीं घेतलें आहे. फुंकलें आहे. ही एक प्रकारें राष्ट्रसेवाच केली आहे. कवीचें सहर्ष स्वागत !

**कासेगांव कॅंप**
**२५।१२।६५**

**वि. स. पागे,**
अध्यक्ष– विधान सभा, महाराष्ट्र राज्य.

# - प्रेरणा -

" साहित्यिकांनीही देशाला पोषाक असें साहित्य निर्माण केले पाहिजे. समाज युद्धोन्मुख होतो तेंव्हां त्याची प्रतिक्रिया ही होतेच. पश्चात्य साहित्यिकांनीही युद्ध जिकण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण केले. युद्धाचें प्रतिबिंब साहित्यावर पडते. माणसेंही संकटकाळी अधिक चांगली वागूं लागतांत. तसेच साहित्यही कसदार निपजतें साहित्याला युद्धकालांत ताकद जोष निर्माण होतो!

कॅम्प-गाडगे महाराज कॉलेज, कराड. कवि–कुसुमाग्रज

# अभिप्राय

एक प्रतिथयश कवि आणि प्राथमिक शिक्षक श्री. बाळ कासेगांवकर यांच्या समरगीतांचा संग्रह ' **रणदुंदुभि** ' हें नामाभिधान घेऊन प्रसिद्ध होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. भावी काळांतील एखादा महाकवि ज्यावर ' महाकाव्य ' लिहूं शकेल असा भारताचा चालू कालखंड ओजस्वी आणी तेजस्वी घटनांनी भरून गेलेला आहे. पाकिस्तानशी झालेला लढा हा आपल्या शूर जवानांची स्फूर्तिदायक ' गाथाच ' होय. या प्रसंगावर कोणाही जातिवंत कवीला कविता लिहिण्याची प्रेरणा होईल. बाळ कासेगांवकर यांची प्रतिभा अशा तेजस्वी प्रसंगावर कविता लिहिण्यांत गढून गेली यात नवल ते काय ? त्यांची काव्य रचना प्रासादिक आणि भावगर्भ अशी असते. अशा दर्जेदार समरगीतांचा व राष्ट्रीय–कवनांचा परिचय या संग्रहाच्या प्रकाशनानें आतां महाराष्ट्राला होत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. पुणें नभोवाणी केंद्राचें लक्ष अशा ओजस्वी कवितांकडें गेल्यास त्या महाराष्ट्रांत घरोघरीं ऐकल्या जातील. राष्ट्राला अशा वाङ्मयाची फार गरज आहे. राष्ट्राचा स्वाभिमान जागृत ठेवण्याचें काम शाहीर, कवि आपल्या कवनांच्या द्वारा करीत असतात, बाळ कासेगांवकर यांचा हा अल्पस्वल्प प्रयत्न अशाच स्वरुपाचा आहे. त्यांच्या या काव्य संग्रहाचें स्वागत रसिक महाराष्ट्र तत्परतेनें करील आणि त्यापासून योग्य ती स्फूर्ति घेईल अशी मी अपेक्षा बाळगतो आणि त्यांचें अभिनंदन करतो.

**ग. ह. पाटील**

पुणें ४।२।१९६६ माजी प्राचार्य ट्रे. कॉ. फॉर मेन, पुणें२

# – रणशिंग फुंकण्याआधीं –

## राष्ट्रप्रेमी अबालवृद्ध रसिकहो ! ............

आज आपण संकटांत आहोत. एका बाजूनें चीन तर दुसऱ्या बाजूनें पाकिस्तान आपल्या भारतभूवर आक्रमण करण्यांसाठी टपून बसले आहेत. अशावेळी सारा देश खडबडून जागा झाला आहे. पण धर्म, जात, पंथ, पक्ष, सारे सारे भेदाभेद विसरून भारतीयांनी आपल्या तिरंगी ध्वजाखाली संघटित झालं पाहिजे. त्यांच्यांत नवचैतन्य, प्रेरणा, देशप्रीति, राष्ट्रभक्ति निर्माण झाली पाहिजे. यासाठीं साहित्यिकावरहि फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. सिनेमा–तमाशांतली रंगदार गीतें नि ढंगदार लावण्या ऐकण्याची व गाण्याची ही वेळ नाही शृंगार रसांत मस्त सुस्त होऊन डुंबत बसण्याचा हा काळ नाही. वीररसाचं आकंठ पान करून, वज्रदेही बनून, आघाडीवर दोन हात करून आक्रमकांना चांगला धडा देण्याची संधी आज चालून आली आहे. शिवरायांचं क्षात्रतेज आज पुन्हा जगाला दाखविण्याची ही वेळ आहे.

शाळकरी मुलांपासून ते टाळकरी भजन्यापर्यंत, लोककविपासून लोक शाहिरापर्यंत, कीर्तनकारापासून–लावणीकारापर्यंत, गायक -गायिकापासून नायक-नायिका–पर्यंत, साहित्यिकापासून सैनिकापर्यंत, किसानापासुन कलाकारापर्यंत सर्वांच्या अणू–रेणूंतुन. अंगांगांतून आज वीररसाचा लाव्हा उफाळला पाहिजे. आणि त्याच्या प्रलयंकारी लोंढयांत साऱ्या दुष्टांचा, शांतता द्रोह्यांचा, आक्रमक सैतानांचा संहार झाला पाहिजे आणि भारतभूमंदिरांतला शांतीचा नंदादीप प्रसंगी क्षात्रतेजाची शौर्याची ज्वलंत ज्योत बनतो, रणकुंडांतील संहारक अग्निशीखा बनून दानवांना भस्मसात करतो हें साऱ्या जगाला आज दाखवून दिलं पाहिजे. त्यासाठीं आज...

त्यासाठीं आज युद्धोन्मुख साहित्याची, समरगीतें, स्फूर्तिगीतांची गरज आहे. आणि म्हणूनच मी आज एक नवोदित कवि या नात्यानं रणशिंग हातीं घेऊन रणदुंदुभिचे स्वर छेडण्यासाठीं सज्ज झालो आहे. यांतील कांहीं स्वर तरूणांना ज़वानांना, किसानांना नवचैतन्य देतील अशी उमेद आहे. रसिक महाराष्ट्रानं माझ्या या प्रयत्नास साथ द्यावीं हीच अपेक्षा !

जय जवान ! जय किसान ! जयहिंद !

२६ जानेवारी १९६६ — आ. नम्र

कासेगांव जि. सांगली. — **– बाळ कासेगांवकर**

# - आभार -

रणशिंग फुंकण्याआधीं या कार्याला ज्यांनी प्रेरणा दिली, सहकार्य दिलें त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

कविमित्र मान. सुधांशु यांनी 'रणदुंदुभिला' प्रस्तावना दिली आणि मोलाचं मार्गदर्शन केलं याबद्दल त्यांचे औपचारिक आभार मानणें योग्य नाही. हा कृपालोभ अखंड लाभावा हीच मनिषा !

श्री. शंकरराव वीर यांनी आपल्या कृष्णाखोरे प्रकाशनाद्वारा रणदुंदुभिचे स्वर रसिकापर्यंत पोहोंचविले आणि मुद्रक- जिल्हा परिषद मुद्रणालय, सांगली व त्याचे प्रमुख नियंत्रक मान. दा. शा. मेहतासो, श्री. मुल्लासो. आणि सुपरवायझर खोत व एस. डी. पाटील व इतर सर्व कामगारांनी छपाईचे काम उत्तमप्रकारे केलें याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे. मे. सॅम आर्ट कोल्हापूर, ब्लॉकमेकर्स श्री. के. सी. भिडे, पुणें यांनी पुस्तकाची सजावट बहारदार केली याबद्दल त्यांचा आभारी आहे.

सांगली जिल्हा परिषदेचे अध्यक्ष – मान. कोरे साहेब, उपाध्यक्ष माननीय एस्. डी. पाटील, शिक्षण विभागाचे चेअरमन मान. ज्ञानदेवराव पाटील, शिक्षणाधिकारी- मान. गोडसेसो उप शिक्षणाधिकारी- मान. शिंदेसाहेब, मा. गायकवाड-साहेब यांनी वेळोवेळीं मला उत्तेजन दिलें नसते तर मी एवढी साहित्यसेवा करूं शकलों नसतो. त्यांची कृपादृष्टी नि उत्तेजन मला अखंड लाभावें हीच प्रार्थना !

मान. वि. स. पागे, अध्यक्ष- विधानसभा- महाराष्ट्रराज्य, मान. नामदार राजारामबापू पाटील, महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य, मान. नाम. बाळासो देसाई गृहमंत्री महाराष्ट्र राज्य या सर्व थोरांचे आशिर्वाद मला लाभले यापेक्षां महद्‌भाग्य तें कोणतं ! त्यांचा मी आजन्म ऋणी आहे.

जयहिंद !

आ. नम्र,

**बाळ – कासेगांवकर.**

# — प्रस्तावना —

कवि-मित्र बाळ-कासेगांवकर यांच्या रणदुंदुभीच्या गंभीर निनादानी मी खडबडून जागा झालो. सुप्त मन जागृत करण्याचें अपूर्व सामर्थ्य त्या स्वरांतून आहे. शब्दांतून आहे.

" रणदुंदुभिचा नाद ऐकुनी
उठतिल योद्धे घराघरांतुनि
आंक्रमकांना रणीं जिंकुनी
विजयी होतील ते — गर्जना नभांगणीं भिडते !

' रणदुंदुभि ' काव्यांत कवीनें दिलेली ही ग्वाही मला सार्थ वाटली. सत्य वाटली.

साहित्यिकाला कालमान परिस्थितीचें भान आवश्य असले पाहिजे. हैद्राबाद येथील साहित्य सम्मेलनाचें उद्घाटन करतांना संरक्षणमंत्री श्री यशवंतरावजी चव्हाण यांनी असेंच आवाहन केलें होतें. जगाच्या इतिहासांतही देश संकटांत असतांना त्या त्या देशांतील विचारवंतांनी आपल्या साहित्यिकांना अशीच हांक दिली होती. आणि साहित्यिकांनी हें आवाहन स्वीकारलेही होते. रणशिंगें फुंकलीं होतीं. रणदुंदुभिच्या तीव्र स्वरांनी वातावरण भारून टाकले होते. आणि कणाकणांतून, मनामनांतून नवचैतन्य खेळविलें होते. ते स्वर प्राशून धुंद झालेल्या योद्ध्यांनी असुरी आक्रमण उधळून लावले होते. — असें आढळेल.

मानवतेवरच आकाश कोसळलें असतांना, पवित्र जीवन-मूल्यांच्या महा-वृक्षावरच शस्त्र चालविलें जात असतांना, नैतिकतेला पायदळीं तुडविणाऱ्या नर-राक्षसांचा नंगानाच चालू असतांना कवीची प्रतिभा जर तेजानें तळपली नाही — त्यानें जर प्रखर शब्दांची अग्निफुलें उधळलीं नाहीत — आपल्या समर्थ शब्दांनी त्यानें जर मृतांना महावीर बनविले नाही — तर त्या प्रतिभेचे प्रयोजन तरी काय?

कवि-कासेगांवकरांनी राष्ट्राच्या आपत्कालीं ' रणदुंदुभि ' घुमविली हें योग्यच केलें. ते ग्रामीण भागांत राहून शिक्षकाच्या पेशांत वावरत असले तरी खऱ्या शिक्षकाला शोभणारे त्यांचे सुसंस्कारी मन राष्ट्रीय वृत्तीनें भारलेलें आहे. कृष्णेचा तेजस्वी संदेश त्यांच्या रोमारोमांत भिनला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या रणयज्ञाच्या ज्वालांनीं त्यांची वृत्ती तेजाळली आहे. म. गांधींच्या शांतियज्ञाच्या दीप्तीनें त्यांचे अंत:करण उजळलें आहे. म्हणूनच त्यांच्या अंत:करणांत काव्य रुजले तें तेजस्वी भावनेचें. त्यावर फुलें उमललीं तीं चैतन्याची. एकेक पुष्प मन नुसते मोहरूनच टाकीत नाही तर तें स्फूर्तीनें रंगतें आणि गाऊं लागतें.

" त्या मातीचे आम्हीं रक्षक
त्या मातेचे पाईक, सैनिक ! "

आणि ग्वाही देतें...

" अजिंक्य आम्हीं आक्रमकांचा नित उतरूं दर्प ! ! "

— बाळ कासेगांवकर

महाराष्ट्रांतील लोकमातांचें अमृत प्यालेला कवीचा पिंड महाराष्ट्राच्या प्रेमानें भारावतो. महाराष्ट्राचे गोडवे गातो....

"शिवरायांचा महाराष्ट्र हा शौर्याचें वरदान
ज्ञानेशाचें, तुकयाचें हें अभंग भक्तिस्थान !
इथेंच स्फुरलें, इथें रंगलें शाहीरांचे गान
त्या शौर्यानें त्या भक्तीनें जगीं मिळविला मान !
इथें गाजले, इथें गर्जले महाराष्ट्र झुंझार ! !"

कवीची 'हिमालयाची हांक' जाग आणते.

त्याचा 'मातीचा जयजयकार' ऐकून मनांत उदात्त भावना उफाळतात.

त्यानें सैनिकांना दिलेली 'मानवंदना' प्रेरक आहे. पोषक आहे.

कवि – बाळ – कासेगांकरांनीं स्फूर्तीची गाणीं गाइली असली तरी तीं खडबडीत नाहीत. त्यांच्या शद्बांतून सौंदर्याचा मंद सुगंध दर्वळतो आहे. 'अशोक चक्रांकिता' गीतच पहा.....

" इथें विखुरल्या दाहिदिशांना पांचूच्या खाणी
हिरवी साडीचोळी लेवुनी सजे धराराणी !
हिरवा श्रावण, निसर्ग हिरवा, हिरवी वनराई
हिरवें वैभव लेऊन नटली इथें धरामाई !
हिरव्या रंगामधुनी खुलते समृद्धी, चारुता ! !"

कासेगांवकरांची कविता तेजाची लेणीं लेऊन वावरत आहे. विविध कल्पनांच्या मनोहर रंगांनी ती नटली आहे.

कासेगांवकरांच्या कवितेंत दोषच नाहीत असे मी म्हणत नाही. पण ते फारच अल्प 'कुंकुमतीलक' 'शूरविरांची' असे शब्द क्वचित खटकतात. पण गुणांच्या प्रकाशांत ते लक्षांत न येण्यासारखे आहेत.

मला समाधान वाटतें तें त्यांच्या कवितेनें युगधर्म पाळला आहे याचे. आज राष्ट्राला हव्या असलेल्या राष्ट्रीय कर्तव्याची हांक ती देत आहे. राष्ट्रांतील आबाल-वृद्धांना युद्धोन्मुख बनविण्याचें कार्य ती पार पाडीत आहे. ही कविता घराघरांतून — शाळाशाळांतून — मनामनांतून पोंचावी, तिच्या निनादांनी मरगळलेली अंतःकरणें तेज पिवून उठावीं. राष्ट्रावर कोसळलेल्या अस्मानी, सुलतानी आपत्तींना निधड्या छातीनें सामोरे जाण्यासाठीं तीं सज्ज व्हावीत. पाशवी आक्रमण उधळून लावण्याचें सामर्थ्य जनमानसांत निर्माण व्हावें हीच इच्छा ! ही इच्छा सफल करण्याची शक्ति 'रणदुंदुभींत' निश्चितच आहे.

याहून मला आणि कवीलाही अधिक काय हवे ? कवि-मित्रा ! — असाच पुढें जा ! राष्ट्र तुझ्या स्फूर्तिप्रद, समर्थ शब्दांचें, तेजस्वी भावनांचें सदैव स्वागतच करील !

जय हिंद !

सुधांशु-सदन
औदुंबर
२६।१।१९६६

**कवि – सुधांशु**

विभाग पहिला –

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५५६०

# १ – रण दुंदुभि

रणदुंदुभि झडते ! गर्जना नभांगणीं भिडते !!
'पाकिस्तानी', 'चिनी' आक्रमक
शिवेंत घुसतां आज अचानक
चाळीस कोटी उठले रक्षक
विरश्री चढते ! गर्जना नभांगणीं भिडते !! १

सुपुत्र आम्हीं 'शिवरायाचे'
रक्त आमुचें रणवीरांचे
शौर्य-दान अन् 'रणचंडी' चें –
नित् आम्हां मिळतें ! गर्जना नभांगणीं भिडते !! २

'कुरु क्षेत्रीं' जे 'महाभारतीं'
'कौरव' गेले लयास अंतीं
तीच असे ही अजिक्य माती –
दानव संहारिते ! गर्जना नभांगणीं भिडते !! ३

त्या मातीचे आम्हीं रक्षक
त्या मातेचें पाईक, सैनिक
ध्वजा आमुची ही चक्रांकित.
अखंड फडफडते ! गर्जना नभांगणीं भिडते !! ४

आक्रमकांशी करूनी संगर
अभंग राखूं आमुचा 'काश्मिर'
स्वत्त्वासाठी लढूं निरंतर –
शांतीस्तव येथें ! गर्जना नभांगणीं भिडते !! ५

रणदुंदुभिचा नाद ऐकुनी
उठतिल योद्धे घराघरांतुनि
आक्रमकांना रणीं जिंकुनी –
विजयी होतिल ते ! गर्जना नभांगणीं भिडते !! ६

● ● ●

# २- गाऊं ! ही मंगल आरती... !

○ ○ ○

भारतमाते ओवाळूं तुज ही मंगल आरती !
गाऊं ! ही मंगल आरती !! ध्रृ.

स्वातंत्र्याचा कुंकुमतीलक
भाली शोभे तव आकर्षक
मुगुट शिरीं हिमगिरि रत्नांकित
उज्वल तव कीर्ती गाऊं... १

उंच तिरंगा फडके गगनीं
शिर उंचावुन बघते धरणी
तुझ्या यशाची गातां गाणीं
येई नवी स्फूर्ति ! गाऊं .. २

उजळित जग हें उजळित अंबर
अखंड जळते ज्योत जवाहर
पावन झालें मानव–मंदिर
देत जगां शांती ! गाऊं... ३

शूर–विरांची तूं तर आई,
कन्या पावन गंगामाई
थोरपणाला सीमा नाही
अजिंक्य तूं जगती ! गाऊं... ४

चीन, पाक वा कुणिहि आक्रमक
शत्रू बनले आज अचानक
' कश्मिर ', हिमगिरि ' देती हांक
लढुं सीमेवरती !! गाऊं... ५

★ ★ ★

– बाळ कासेगांवकर.

# ३ – अशोकचक्रांकिता

फडफडते ही ध्वजा तिरंगी अशोक चक्रांकिता !
चाळीस कोटी भारतियांची मंगल ही देवता !!

'लाल', बाल अन 'पॉल', 'शिवाजी', अथवा 'नेताजी'
धारातीर्थी पावन झाले जे जे रणगाजी !
हिच्याचसाठीं ज्यांनी केलें रक्ताचें दान
'रंग केशरी' असे तयांच्या शौर्याची खूण !
उणीच पडते वाणी माझी वर्णाया योग्यता !! १

मंगल इथल्या माता, दुहिता, कांता अन् भक्ती,
पवित्र इथल्या सरिता, सागर, मंगल ही माती !
उंच हिमासन उच्च संकृति, शिरी शांत बर्फ
अजिक्य आम्हीं ! अक्रमकांचा नित उतरूं दर्प !
'शुभ्र रंग' हा अभंग राखील विश्वाची शांतता !! २

इथे विखुरल्या दाहिदिशांना पांचूच्या खाणी
हिरवी साडी-चोळी लेउन सजे धराराणी !
हिरवा श्रावण, निसर्ग हिरवा, हिरवी वनराई
हिरवें वैभव लेउन नटली इथें धरामाई !
हिरव्या रंगामधुनी खुलते समृद्धी, चारुता !! ३

'अशोकचक्रांकिता' मानिनी नभांत फडफडते
श्रीकृष्णाचें 'चक्र-सुदर्शन' रिपुमर्दन करते !
विश्वशांतिचा मंत्र हिच्यातुन उद्घोषित होतो
जयजय भारत! जय हिम पर्वत घोष नभीं भिडतो !
अजिक्य-अविरत, अमर अशी ही भारतीय अस्मिता !! ४

हिच्या रक्षणासाठीं आम्हीं करुं प्राणांचे दान
आक्रमकांचे सीमेवरती करुं आम्हीं शिरकाण !
ज्या भूमीनें शिकंदराचा इथें उतरला माज
त्या भूमिवर फडफडते ही ध्वजा तिरंगी आज !
अखिल जगाला सांगतसे ही स्वातंत्र्याच्या कथा !? ५

★ ★ ★



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४४०२८ दि. ......

# ४ - हा महाराष्ट्र माझा

हा महाराष्ट्र माझा ! हा महाराष्ट्र माझा !!
जिथें निपजले मर्द मराठे ! जिथें गाजला शिवराजा !! ध्रृ.

या मंगल ' गोदा ', ' कृष्णा ' – शमविती मराठी तृष्णा
या तरवारी लखलखत्या–जणु स्वराज्य रक्षणकर्त्या
नवसंस्कृतिचे संजीवन हें मृतांनाहि पाजा !!

हा शौर्याचा आवेश–हा शांतीचा संदेश
हा ' कोंकण ', अन् हा देश–हा ' विदर्भ ' हा ' खानदेश '
उत्क्रांतीचा उजळ कीर्तिचा इतिहास ताजा !!

हा उभा इथें ' सह्याद्री '–जणुं राखणदार करारी
हा ' अरबी ' पश्चिम तीरी–किति अथांग माया उदरीं
आक्रमकांना देत राहतिल मरणाचीच सजा !!

हा पूर्वज ' ज्ञानेशाचा '–हा वंशज अन् ' तुकयाचा '
हा पूजक या वेदांचा – हा ' रामदास ' दासांचा
अभंग आहे कीर्ती यांची त्रिखंडांत समजा !!

हा पाईक सुसंस्कृतिचा – हा सैनिक भारतभूचा
हा सेवक सद्धर्माचा – हा प्रेषित नव्या मनूचा
क्रान्तिवीर हा भारतभूचा उंचाविल दर्जा !!

हा देशभक्त गुणवंत – हा पंडीतराज महंत
हा विश्वशांतीचा संत – हा दलितांचा ' यशवन्त
सदा झुंजला मुक्तीसाठीं हाच शूर सर्ज्या !!

हा भारतभू अभिमान – हा अमुचा मंगल प्राण
हा उभविल उंच निशाण – हा गाईल नित् यशगान
भाग्यवन्त हा ! शांतिदूत हा ! जय जय जय गर्जा !!

१५ ऑगष्ट निमित्त....

# ५ - फडफडते ही ध्वजा तिरंगी !

[ चाल :- रिमझिम पाऊस पडे सारखा ]

फडफडते ही ध्वजा तिरंगी – सरसर वरती उंच चढे
शुभमंगल हें आज घडे – पण चला भराभर पुढें पुढें !! ध्रृ.

तरुवर फुलले, फुलल्या वेली
भकास रानें हसलीं गालीं
वैशाखाची वखवख सरली – जळजळणारें ऊन दडे !! १

अष्टदिशाचीं दलें उमललीं
क्षितिजावरती उधळित लाली
मुक्त – चंद्रिका – प्रभा पसरली घालित भूंवर गंधसडे !! २

धावुं लागल्या या निर्झरिणी
समृद्धीचे कलश घेउनी
वर्षंत अमृत नव संजिवनी – वैभवास नव रंग चढे !! ३

सत्य-अहिंसा शस्त्र आमुचें
पारिपत्य करी आक्रमकांचे
सैनिक आम्हीं स्वातंत्र्याचे – विश्वशांतिचे देऊं धडे !! ४

अण्वस्त्रांची आम्हां न भीती
शस्त्रें आमुची शांती, प्रीती
परी सांगिनी लाउन पाठी–क्रान्ती घडवूं चहूंकडे !! ५

करूं कुणावर कधि न आक्रमण
स्वातंत्र्याचें करूं संरक्षण
आक्रमकांना दावूं विक्रम-गर्जंत जयजयकार खडे !! ६

सिमेवरती आम्हीं झगडूं
अन्यायाला पायीं रगडूं
लढतां लढतां फोडूं-झोडूं–रिपु सैन्याचे भव्य कडे !! ७

स्वातंत्र्याचे आम्हीं शिपाई
आम्हीं सारे भाई भाई –
भारत माता आमुची आई–वैभव शिखरावरी चढें !! ८

卐 卐 卐

# ६ – गर्जा जयजयकार !

गर्जा जयजयकार !

जय महाराष्ट्र! जय महाराष्ट्र हा गर्जा जयजयकार !!
शिवरायांचा महाराष्ट्र हा शौर्याचें वरदान
'ज्ञानेशाचें,' 'तुकयाचे' हें अभंग भक्ति स्थान !
इथेंच स्फुरलें ! इथें रगलें शाहीरांचे गान
त्या शौर्यानें, त्या भक्तीनें जगीं मिळविला मान !
इथें गाजलें, इथें गर्जले महाराष्ट्र – झुंजार !!

सह्यगिरीच्या उरीं उफाळें मंगल-जल, अंगार
देशभक्तिचे मळे बहरले, तेज भरे अनिवार !
त्या तेजानें इथें तळपले नरशार्दुल दिलदार
'लोंकमान्य', 'रानडे' फुल्यासम रत्नांचें भांडार !
महाराष्ट्राच्या कंठीं असल्या नररत्नांचें हार !!

इथें जन्मलें, अमर जाहले क्रान्तीचे ग्रंथ
कीर्तिसुगंधें बहरून गेले शांतीचे पंथ !
या संस्कृतिला या सुकृतिला आदि नच् अंत !
पिढयापिढयांतुन जन्मा आले असेंच यशवन्त !
बलवन्तांचा, गुणवंतांचा हा मौलिक संभार !!

'भीमा', 'भद्रा', 'निरा', 'कोयना', 'गोदावरी', 'कृष्णा'
समृद्धीचे कलश वाहुनी शमवितांत तृष्णा !
स्त्री–रत्नांची खाण जणूं ही महाराष्ट्र–माता
थोर 'अहिल्या' 'झांशीवाली' मर्दानी दुहिता !
युगें युगें हा इथें चालला सोन्याचा संसार !!

महाराष्ट्र हा महान माझा वाण कशाची नसे !
ताठ मान परि स्वभिमान उरीं प्राण भरूनिया वसें !
देशभक्तिचा, विश्वशांतिचा मंत्र इथें घुमतो
विश्वाचा इतिहास नवा हा महाराष्ट्र लिहितो !
भारतभूचा दिव्य दिप हा उजळितसे अंधार !!

★ ★ ★

# ७– असूं खरे यशवन्त !

असूं खरे यशवन्त ! आम्हीं भारतीय बलवन्त !! ध्रृ.
शांतिदूत आम्हीं युगायुगाचे
प्रेषित आम्हीं नव्या मनूचे
भाग्यविधाते भारत भू चे –
मानवतेचे संत ! आम्हीं भारतीय बलवन्त !! १
उज्वल आमुची उच्च संस्कृती
मंगल आमुचों ध्येया–सवती
बंधुत्त्वाची जोडूनी नातीं
निर्मितसूं सत्पंथ ! आम्हीं भारतीय बलवन्त !! २
उभा पाठिशी तुंग हिमाचल
पायथ्यास हे सागर-शीतल
जीवन फुलवी गंगेचें जल –
मंगल मूर्तींमंत ! आम्हीं भारतीय बलवन्त !! ३
इथें बहरलें ' काश्मिर ' नंदन
त्याच्यावरती करूनि आक्रमण
दुष्ट ' चीन ' अन् ' पाकिस्तान '
पेटविती आसमंत ! आम्हीं भारतीय बलवन्त !! ४
आम्हीं शिपाई शिवरायाचे,
शूर पुत्र अन् झांशिवालिचे
भाऊ आम्हीं भगतसिंगचे
विजयाची नच खंत ! आम्हीं भारतीय बलवन्त !! ५
हटवूं मागे क्रूर आक्रमण
अन् दुष्टांचे करूं निर्दालन
स्वातंत्र्याचें करूंच रक्षण
चिरूनी रिपूंचे कंठ ! आम्हीं भारतीय बलवन्त !! ६
इथें जन्मले थोर महात्मे
' प्रताप ', ' शिवबा ' योद्धे मोठे
' गांधी ', ' जवाहर ' वंद्य हुतात्मे –
नेते प्रज्ञावंत ! आम्हीं भारतीय बलवन्त !! ७
नव्हे आमुची ही दर्पोक्ती
अजिंक्य आमुची शक्ती, भक्ती
विश्वशांतिस्तव इथें जन्मती –
अमर-क्रान्तिचे ग्रंथ ! आम्हीं भारतीय बलवन्त !! ८

# ८ – पार्था ! शस्त्र करीं घे आतां !

सांगते भगवंतांची 'गीता'! 'पार्था'! शस्त्र करीं घे आतां !! ध्रु.

शस्त्रें ठेवुन शमिवृक्षावर
शांतिसाठीं तूंच आजवर
अशी तपस्या केली खडतर
संपली आज तुझी सोशिकता ! पार्था ... १

'पाकिस्तानी' कपटी 'कौरव'
वैरी बनले तुझेंच बांधव
जाळूं बघती सारे पांडव
ठेव तूं सज्ज शरांचा भाता ! पार्था ... २

अविचारी हे 'पाकिस्तानी'
चीन तयांचा 'मामा शकुनी'
भारतभची सीमा लघुनी–
करिती सीमोल्लंघन आतां ! पार्था ... ३

'आयूब' असला जरि 'दुर्योधन'
'भुट्टो' बनला जरि 'दुःशासन'
तुझे सारथी–शास्त्री, अर्जुन !
सैन्य ही चाळीस कोटी जनता ! पार्था ... ४

तटस्थेतेचें सोडुनि धोरण
या दुष्टांचें कर निर्दालन
स्वातंत्र्याचे करुनी रक्षण
स्थाप या जगीं शांतता समता ! पार्था ... ५

'पाश्चिमात्य' 'द्रोणाचार्यांनी'
'चक्रव्युह' कपटानें रचुनी
'अभिमन्यु–काश्मीर' मारुनी
साधिला डाव तुझ्यावर पुरता ! पार्था ... ६

निसर्ग सुंदर, नयनमनोहर
नंदनवन हें तुझेच 'काश्मीर'
घटकराज्य अविभाज्य निरंतर
तयांवर संकट चालुन येतां ! पार्था ... ७

सती द्रौपदी भारत–भूमी
विटाळिलें तिज ज्या दुष्टानी
तेंच 'चिनी' अन् 'पाकिस्तानी'
लढाया 'कुरुक्षेत्रावर' येतां ! पार्था ... ८

# १ – मानवंदना

○ ○ ○

स्वातंत्र्याचा तूं संरक्षक अशी तुझी धारणा !
कोटी–करांची तुला सैनिका घेई मानवंदना !! ध्रृ.

या मातीचा वीर–पुत्र तूं,
शिवरायांचा रे वारस तूं,
'बाबूगेनू', भगतसिंग तूं,
'प्रतापराणा', 'नेताजी', तूं हीच जनी भावना !! १

क्रान्तिवीर तूं, देशभक्त तूं,
इतिहासाचा–नव लेखक तूं,
भारतभूचा मानदंड तूं
अशोकस्तंभावरील सिंह तूं उठव तुझी गर्जना !! २

वज्रदेहि तूं, तूं मृत्युंजय
भारतभूचा तूंच धनंजय
अखंड अविरत तुझाच रे जय
शस्त्र तुझे तर अभंग, अक्षय–सज्ज सदा रक्षणा !! ३

अजिक्य अविरत तुझी वीरता,
पराक्रमाची भगवी गाथा–
अभिमानानें गातां गातां–
उन्नत होई माथा माथा ! मिळे नवी प्रेरणा !! ४

त्याग तुझा रंगतो संगरीं,
तव रक्ताचा रंग केशरीं,
लेउन फडके ध्वजा अंबरीं–
तुझ्या जयाच्या रे रणभेरी भिडवी गगनांगणां !! ५

यवन मातले बनले कौरव
कश्मिरसाठीं करिती तांडव
परि न पांडवा तुझा पराभव
जय जय भारत ! अखंड अभिनव घुमव तुझी घोषणा !! ६

★ ★ ★

# १० – जिंकूं अथवा मरूं !

★ ★ ★

जिंकूं अथवा मरूं !

रणचंडीला शिरकमलें निज सहर्ष अर्पण करूं !!
स्वातंत्र्यावर येतां संकट
आम्हीं उभारूं छातीचे तट
आक्रमकांना करुनी चितपट
हटवूं मागे असुर-आक्रमण ! विजयश्रीला वरूं !!

'चीन' 'पाक' जरि पेटुन उठला
शांत हिमाचल जरि धगधगला
निज रूधिरानें विझवूं त्याला
तटस्थतेचे ध्येय पाळुनी सीमारक्षण करूं !!

वंशज आम्हीं 'शिवरायाचे',
'तानाजी' अन् 'बाजीप्रभूचे'
सुपुत्र आम्हीं 'झांशिवालि' चे
क्षात्रतेज हें महाराष्ट्राचें सीमेवर उतरूं !!

शिवेंत पडतां पिवळें पाऊल
बर्फ शांतीचे वितळुन जाईल
अण्वस्त्रांसम पेटत राहिल
अभंग आपुल्या स्वातंत्र्यास्तव अखंड संगर करूं !!

चौदा भाषा असंख्य जाती
एकच माता, एकच माती
एक रक्त अन् मंगल नातीं
जिंकूं अथवा मरुं ! मरुन ही पुन्हां जगीं अवतरूं !!

● ● ●

 – बाळ कासेगांवकर

# ११- या मातींतुन गर्जुन उठला वेदांचा हुंकार !

गर्जा जयजयकार ! मातीचा गर्जा जयजयकार !

ज्या मातीतुन गर्जुन उठला वेदांचा हुंकार !!
या धरणीच्या पोटीं जन्मले सुरासूर मोठें
या धरणीच्या कुशित वाढले संत महात्मे ते
मातीने मातींत मिळविला असुरांचा संभार !!

या मातीच्या कणाकणांतुन उठले रणझुंझार
या मातेच्या मायेनें हें विश्व होइ साकार
या मातीवर भक्ती ज्यांची तेंच अमर ठरणार !!
अनाद्य, शाश्वत, अनंत पावन ही धरणीमाता
अन्न-वस्त्र-आसरा देतसे! थोर तिची ममता
तिचा आम्हांवर आमुचा तिजवर समसमान अधिकार !!

कुणी करंटी तिची पोरटी करोनिया फाळणी
तुकडे तुकडे करुनि झगडती सीमेच्या कारणी
दान दिले जें तिनें एकदां अभंग तें उरणार !!
भाऊ भाऊ असुन झगडती, अतिक्रमण करिती
इतरावर स्वामित्व कराया बळेंच गुरगुरती
स्वार्थासाठी पथीं पसरती वैऱ्याचे अंगार !!

विश्वशांतिचा यज्ञ करा अन् बंधूभाव ठेवा
अण्वस्त्रांनी जाळुनि टाका हा हेवादावा
करा सुखें संसार! उमटला मातींतुन ललकार !!

या मातींतुन जन्मा आली ही सारी सृष्टी
मातीला माती मिळणार शेवटी ही सारी माती
त्या मातींतुन होते अंती विश्व नवें साकार !!

★ ★ ★

# १२ – जाऊं कां गं आऽऽई ?

ऐकलंस कां गं आई ! आई ऽऽ !
सीमेवर चालली लढाई !
शूर शिपाई होऊन मीही – जाऊं कां गं आऽऽई ? ! ध्रृ.

पाकिस्तानी क्रूर आक्रमक
दुष्ट चिनीही घालिती धाक
स्वातंत्र्याचा पण मी रक्षक
बनुनी मोठ्ठा मी वैमानिक – जाऊं कां गं आ ऽऽई ? ! १

सीमेवरती संकट आले
बर्फ शांतिचें पेटुन उठलें
कौरव – पांडव युद्ध भडकलें
खेडें खेडें जागें झालें – जाऊं कां गं आऽऽई ? ! २

बनेन मीही शूर शिवाजी
'प्रतापराणा' वा 'नेताजी'
अथवा 'तानाजी' वा 'बाजी'
हीच प्रतिज्ञा आई माझी – जाऊं कां गं आऽऽई ? ! ३

फौज घेऊनी बाल विरांची
उडविन दाणादाण शत्रुची
शपथ खरोखर तुझ्या गळ्याची
जिरवायाला आक्रमकांची – जाऊं कां गं आऽऽई ? ! ४

* * *

नको मला केपांची बंदुक
लुटूपुटीचा मी नच सैनिक
जवान छोटा मी संरक्षक
दर्यावर्दी बनुनी नाविक – जाऊं कां गं आऽऽई ? ! ५

आक्रमकांची उडवुन डोकीं
जिंकिन आघाडीचीं नाकीं
शौर्य गाजविन या भूलोकीं
गर्जत जय भारत माता की ! जाऊं कां गं आऽऽई ? ! ६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५५६०
शाखा (स्थळ प्रत)

# १३- माझ्या गडे देव्हाऱ्यांत !

माझ्या गडे देव्हाऱ्यांत – थोर हुतात्म्यांच्या मूर्ति
माझ्या अंतराच्या पुटी – असेलच देव कोटी !
माझ्या गडे देव्हाऱ्यांत – थोर थोर देशभक्त
ज्यांनी माझ्या भारताला – दास्यांतून केले मुक्त !
माझ्या गडे देव्हाऱ्यांत – शूर, वीर, संत मूर्ति
ज्यांनी माझ्या भारताची – जगीं वाढविली कीर्ती !
माझ्या गडे देव्हाऱ्यांत – विश्वशांतीचा प्रणेता
मिळवून दिली ज्यानं – भारताला स्वतंत्रता !
माझ्या गडे देव्हाऱ्यांत – माझा ' जवाहर ' संत
हिंदमाता देवता ही – माझ्या मनोमंदिरांत !
माझ्या गडे देव्हाऱ्यांत – थोर युगप्रवर्तक
सांदीपनीचे वारस – थोर शिक्षक पाईक !
माझ्या गडे देव्हाऱ्यांत – स्वारी शूर शिवबांची
महाराष्ट्रांत स्थापिली – गादी ज्यांनी स्वराज्याची !
माझ्या गडे देव्हाऱ्यांत – मूर्त राणी-लक्ष्मिची
झांशीसाठीं दिली जिनं – प्राणाहुती सर्वस्वाची !
माझ्या गडे देव्हाऱ्यांत – माझे स्वराज्य-रक्षक
' यशवन्त ' पराक्रमी – वीर झुंजार सैनिक !
माझ्या गडे देव्हाऱ्यांत – थोर माझे पतिदेव
पूजिते मी मनोभावे – ठेवुनिया प्रेमभाव !
माझ्या गडे देव्हाऱ्यांत – ध्येयाचा गं धूप जळे
दिव्य ' जवाहर-ज्योत ' – तिथें अखंड पाजळे !
माझ्या गडे देव्हाऱ्यांत – तेवतसे नंदादीप
जळतसे नित्य तिथें – सत्य-अहिंसेचा धूप !
माझ्या गडे देव्हाऱ्यांत – देव नाहित दगडी
हवे कशाला मला तें – व्यर्थ वैभव बेगडी !
माझ्या गडे देव्हाऱ्यांत – देव बोलते-चालते
जिवित गं धन्य माझे – दर्शनानं त्यांच्या होतें !
माझ्या गडे देव्हाऱ्यांत – देवांची गं नाही वाण
भाग्यवान कवठी मी – इहलोकीं पुजारीण !!

★

– बाळ कासेगांवकर



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४४०२८ दि. ....
९५५६० नोंद दिर ....

# १४- हिमालयाची हांक

आज पेटलें बर्फ अचानक बसे जगाला धाक !
कैलासाचा भाला परजुन देई हिमालय हांक !!
हांक ऐकतां हिमालयाची उमावराला आली जाग
तृतिय-नेत्र उघडून चिन्यांवर प्रलयंकारी ओकीत आग
गिरीजटांतुन खवळुन उठले महाविषारी मंथर-नाग
चित्ताभस्म करण्यास चिन्याचे जाळुनि होतां राख !!
'कांचन गंगा,' धवलगिरीचे' उभे ठाकले रण भाले
हिमालयाचे अंग चिन्यांच्या रक्तानें भिजुनी न्हालें
आक्रमकांचें रक्त प्राशुनी पाषाणहि हर्षित झाले
जयजय भारत ! गर्जत उठले सैनिक त्यांतुन लाख !!
कैलासाचा स्वर्ग लुटांया दानव हे झाले धुंद
पंचशील तुडवून चिन्यांनी चालविलें पाहुन युद्ध
क्रुद्ध जाहले 'दलाई लामा' सत्य-अहिंसक तो 'बुद्ध'
श्रीकृष्णाचा धावा करती, " सोड 'सुदर्शन चाक' !!
हिमालयाची हांक ऐकुनी झणी धावला 'सह्यगिरी'
शिवरायाची आण घेउनी संगिनी रोखुन चिन्यावरी
'हर हर हर महादेव !' गर्जना घुमवुन काढित दरी दरी
हिसकुन घ्याया प्रदेश आपुला ठेंचुन नकटे नाक !!
हिमालयाची हांक ऐकुनी त्वेष मनांतिल वर उसळे
'लढाख,' 'नेफा', राऊळांत जणुं देहांचा कापूर जळे
धारातीर्थी पावन व्हाया रुधिर आमुचें सळसळलें
त्यां रक्तानें विझवुन टाकूं सारी आग क्षणांत !!
घेउनि अमृतकुंभ धावती गंगा-यमुना हिमाचलीं
तेंच प्राशुनी आज झगडतो सैनिक आम्हीं महाबळी
मरुनी आणिक जिवंत होईल रणीं आमुची जातकुळी
'मॅक्मोहनच्या' पार पिटाळूं 'लालभाई' अन् 'पाक' !!
अखंड भारत जागुन उठला 'जवाहरांच्या' आज्ञेनें
तळहातावर शीर घेउनी विश्वशांतीच्या प्रज्ञेनें
मानाचें तें मरण मिळवण्या अखंड झगडूं श्रद्धेनें
हुकुमशहांना आक्रमकांना गाडील 'जनसत्ताक' !!

---

# १५ - चिनी 'माँऊ'!

चिनी माँऊ ! चिनी माँऊ !
आम्हीं समजत होतो तूं आमचा भाऊ !!
पायांत घोटाळून - लाडीगोडी लावून
हळूंच बसलास तूं सिमेवर येवून !
पंजाच्या नखांना धार लावत
आलास अचानक लपतछपत !
'हिम' वाटला लोण्याचा गोळा
म्हणून त्यावर ठेवून डोळा !
केलास असला घातकी चाळा
भोलानाथ आमचा खरंच भोळा !
डोळे मिटून तूं लागलास खाऊं
गुर गुरूं लागलास म्याँऊ म्याँऊ !
चिनी माँऊ ! चिनी माँऊ तूं नाहीस आमचा भाऊ !!
प्रचंड हिमालय पर्वत पोंखरून
काढूं लागलास तूं उंदीर शोधून !
किरण साधून कैलासावर
झेप घेतलीस बेधडक वर !
खवळून उठले चाळीस कोट शंकर
करूं लागले तुझ्याशी संगर !
गौरी शंकराचें त्रिशूळ परजून
शांतीचा बडगा बाजूला ठेवून !
गुर गुरूं लागलास तूं म्याँऊ म्याँऊ !
चिनी माँऊ ! चिनी माँऊ ! तूं नाहीस आमचा भाऊ !!
'हिम' वाटले तुला छानछान लोणी
बेवारशी आहे ! रक्षक नाहीं कुणी !
खायला धावलास पण झाले त्याचे पाणी
तोंवर आला बडगा घेऊन धनी !

# १५ – चिनी 'माँऊ'! ( पुढें चालूं )

" काय करतो मला शांतीचा बडगा "
अशी तुझी समजूत ! स्वभावच कोडगा !
गुर गुरूं लागलांस तूं म्याँऊ म्याँऊ !
चिनी माँऊ ! चिनी माँऊ ! तूं नाहीस आमचा भाऊ ! !

अचानक घातलीस आक्रमक उडी
धडाधड पाडल्यास शांतीच्या उतरंडी !
' पंचशील ' फाडून केल्यास चिंध्या
ढोंगीपणानें केलीस शांतीची ' संध्या '

हिमालयाएवढं भांडं लोण्याचं
मिळावं आपणाला म्हणून कायमचं !
डोळे मिटून तूं घातलंस तोंड
दोन-तीन लचके लागले गोड !

अडकले डोकें पण कायमचें भांड्यांत
मानेवर रुतला मडक्याचा काठ
दऱ्या खोऱ्यांतून गोते खात खात
फिरलास माघारी आपल्या मुलुखांत !
हिमाच्या कड्यावर मडके आपटले
भांडे फुटले पण काठ आडकले !

अशी तुझी मोडली खोड
सीमेची केलीस बरीच मोडतोड !
पंजे उगारून गुरगुरशी म्याँऊ म्याँऊं
आंता आलास शिवेंत तर आम्हीं ही धांवूं
शिखरांचे भाले घेऊन येऊं

कापून काढूं तुझं नकटं नाक
तुझी करूं आम्हीं जाळून राख
चिनी माँऊ ! चिनी माँऊ ! तूं नाहींस आमचा भाऊ ! !

卐 卐 卐

सीमा आघाडीवर निघालेला सैनिक कारभारणीचा निरोप घेतांना तिची अशीच समजूत घालील ना ? ......

# १६ - तिकडं बर्फाला लागलिया आग गं !

तो:- तिकडं बर्फाला लागलिया आग गं ऽऽ !
सह्याद्रीला आली आतां जाग गं !
चिनी सैतान मग्रूर भारी
बुद्ध मुखांत बगलेत सुरी
आक्रमणीं लालसां आसुरी । करी फुत्कार पिवळा नाग गं !!
आक्रमकांचं पाहून युद्ध
सारा कैलास झालाया क्रुद्ध
संतापला अहिंसक बुद्ध । आलां 'दलाई लामांना' राग गं !!

ती:- कसं आक्रित बाई ह्यें घडलं
दोन मित्रांत अंतर पडलं
पंचशील कुठं बाई दडलं । चिनी मेल्यांनी फेडला की पांग गं ऽऽ !!

तो:- जागा झाला कैलासी शंकर
आग ओकी नेत्र भयंकर
क्रूर चिन्यांचा करी संहार। रण झालंय् 'नेफा' 'वालाँग' गं ऽऽ !!
उभे करून शिखरांचे भाले
गौरीशंकरही सिद्ध झाले
'नेफा,' लढाख, रक्तांत न्हालें । नको अडवूस समजून नाग गं ऽऽ !!
हिमालयाची ऐकून हांक
वीर धावून गेल्यात लाख
ठेचाय चिन्यांचं नकटं नाक । कसा थांबूं घरीं आतां सांग गं ऽऽ !!

ती:- नका थांबूं आतां घडीभर
कां मीबी येऊं तुम्हांबर
ह्या ह्ये सरकारला दागीनं सारं । हिंदभूला वाहू सौभाग्य गं ऽऽ !!

तो:- नको करु मनीं हळहळ
गंगा माईचं निर्मळ जळ
आम्हां देईल भीमाचं बळ । कुंकू राखील तुझं अभंग गं ऽऽ

दोघेजन:- आग लागताच त्या 'हिमाला'
'सह्य' धावून मदतीस गेला
चला आपण जाऊं आघाडीला । घेऊं हिसकून जिकलेला भाग गं ऽऽ !!

* * *

# १७ – क्षितिजीं आल्या प्रकाशरेषा !

अमर शांतिनें उजळित देशा !
क्षितिजीं आल्या प्रकाशरेषा !!

सचेतनांतुन, अचेतनांतुन
चैतन्याचें अमृत ओतुन
फुलवी मृण्मय – मानव – आशा !!

सहकाराचीं स्वप्नें उभवित
मनामनाचीं नातीं जुळवित
दलितांच्या जाळीत निराशा !!

त्रस्त – ग्रस्त जनसंभारांतुन
सैतानांच्या संहारांतुन
विश्वशांतिची घुमवित भाषा !!

अण्वस्त्रांच्या भीषणतेंतुन
सत्य – अहिंसा बीजें पेरून
थांबविण्यास्तव विश्वविनाशां !!

अंधाराच्या कारा भेदुन
गगनीं आला तारा उगवून
देत क्रान्तिच्या नवसंदेशां !!

# १८ – शांतिदूत जरि आम्हीं जगाचे !

शांतिदूत जरि आम्हीं जगाचे –
तटस्थतेचें आमुचें धोरण !
आक्रमकांना ठेंचुन काढित
विश्वशांतिचे बांधू तोरण !!
शांतिदूत जरि आम्हीं जगाचे –
सत्य–अहिंसा आमुचा मंत्र !
करूं संरक्षण 'संगीनी' रोखुन
लोकशाहिचे चालवूं यंत्र !!
शांतिदूत जरि आम्हीं जगाचे ..
मानतसूं जरि कुणा न शत्रू
करील जर कां कुणी आक्रमण
शस्त्रें घेउन रणांत उतरूं !!
शांतिदूत जरि आम्हीं जगाचे –
'बुद्ध' – गांधीचे आम्हीं पाईक
'बाजीराव' अन् 'बाजीप्रभुचे–
'शिवरायाचे' आम्हीं सैनिक !!
शांतिदूत जरि आम्हीं जगाचें–
सुपुत्र आम्ही जरि संतांचे !
अन्यायाशी सदा झगडतिल
उच्च संस्कृति ग्रंथ आमुचे !!
शांतिदूत जरि आम्हीं जगाचे
'लालसर्प' जर करतिल दंश !
'सर्पसत्र' करण्यास बैसलो
कोटीकोटी 'जनमेजय' खास !!
शांतिदूत जरि आम्हीं-जगाचे–छळतिल जरि हें 'पिवळें दानव' !
शांतियज्ञ हा पुरा कराया– चाळीस कोटी बसले मानव !!
शांतिदूत जरि आम्हीं जगाचे– साम्राज्याची आम्हां न तृष्णा !
शिवेंत येइल जर कां शत्रू– 'जय जय भारत!' करूं घोषणा !!
शांतिदूत जरि आम्हीं जगाचे–
तटस्थतेचें आमुचें धोरण !
मोल जिवाचें देउन आम्हीं–
स्वातंत्र्याचे करूं संरक्षण !!

★ ★ ★

– बाळ कासेगांवकर.

# १९– अर्जुना ! ऊठ सज्ज हो रथीं !

○ ○ ○

‘ कृष्ण ’ तुझा सारथी ! ‘ अर्जुना , ! ऊठ सज्ज हो रथीं !! ध्रु.

अठरा अध्यायाची ‘ गीता ’
जागविते बघ तुजला ‘ पार्था ’
अजिंक्य अविरत तुझी वीरता
असे तुझ्या संगती ! अर्जुना ! ऊठ सज्ज हो रथीं !! १

‘ धर्म ’ तुझा हा साधा-भोळा
‘ धृतराष्ट्राचा ’ न्याय आंधळा
म्हणुनि आज हा कलह मातला
सत्य पडें संकटीं ! अर्जुना ! ऊठ सज्ज हो रथीं !! २

राज्य-लालसा ज्यांना भारी
स्वार्थ जयांचा दुष्ट आसुरी
बांधव नच हे ! हे तव वैरी
भुतें बनुन नाचतीं ! अर्जुना ! ऊठ सज्ज हो रथीं !! ३

लाव धनुष्याला तूं बाण
या दुष्टांचे कर शिरकाण
सद्धर्माचे कर संरक्षण
कृष्ण-प्रभू सांगती ! अर्जुना ! ऊठ सज्ज हो रथीं !! ४

‘ कुरुक्षेत्र ’ तें पुन्हां रंगुंदे
कौरव-कुल हें नाश पावुंदे
मंगलमय ही धरा होऊंदे
पुन्हां ‘ महाभारतीं ! अर्जुना ! ऊठ सज्ज हो रथीं !! ५

निज-रक्ताच्या लाल-शाईनें
लिहुन काढ इतिहास नव्यानें
शौर्य-धैर्य, तव पुण्याईनें
पावन कर ही क्षिती ! अर्जुना ! ऊठ सज्ज हो रथीं !! ६

# २० - "शांतीपूर्वी वादळ उठतें!"

आज उद्याचें जीवन फुलतें !
आज उद्याचें भाकित कळतें ! !
या क्रान्तींतुन, या शांतींतुन
या गीतांतुन, या गीतेंतुन
त्या भूतांतुन, भवितव्यांतुन
इतिहासाचें पान उलटतें ! !
या दू:खांतुन, याच सुखांतुन
या आशेंतुन, नैराश्यांतुन
या समिरांतुन, या तिमिरांतुन
दुरित कुणाचें जागुन उठतें. ! !
या श्रमिकांच्या श्रमदानांतुन
या धनिकांच्या धनलोभांतुन
या क्षुधितांच्या क्षुधातृषांतुन
जीवन-अमृत ढवळून निघतें ! !
या सत्तेंतुन, मदमत्तेंतुन
या स्वार्थांतुन, या त्यागांतुन
जीवन दुबळें निघतां भरडून
उत्क्रांतींतुन शांती फुलतें ! !
समतेंतुन या विषमतेंतुनी
धर्म-पंथ अन् मतभेदांतुनी
करूण कथा या घडती अजुनी
शांतीसाठीं जग तळमळतें ! !
दु:ख आजचें सुखे उद्यांची
वृक्ष आजचा फळें उद्यांची
तिमिर आजचा प्रभा उद्यांची
रात्रींनंतर उषा उमलतें ! !
कालचक्र हें चराचराचें,
रणकंदन हें सत्तांधाचें
सूचक भावी विश्वशांतिचें
"शांतीपूर्वी वादळ उठतें" ! !

★ ★ ★

# २१ – बघते राया वाट !

चिंतातुर होऊन मानसीं बघते राया वाट
विजयी वीरां ओवाळाया आतुरले मन नाथ !! ध्रु.
पाणवठ्यावर उभीं राहुनी
दूरदूरवर नजर टाकुनी
पंचप्राण डोळ्यांत आणुनी
मनांत म्हणते पडेल केव्हा प्राणसख्याची गाठ !! १
पलीकडे त्या वनराईंतुन
शिवेलगतचा डोंगर उतरून
धीरानें तूं निरोप घऊनी
दूर निघुन गेलास प्रीतीची बांधुनिया निर्गाठ !! २
इथें कितिकदां आपण आलों
गुलगुल गोष्टी करित रंगलों
परस्परांवर रुसलों फुगलों
आठवणी त्या येतां भरती डोळे कांठोकांठ !! ३
तेव्हां पासुन तुझी खुशालीं
राया मजला नाही कळली
उगां मनां हुर हूर लागली
रुचें न खाणें-पिणें झोपणें होते चिंताक्रांन्त !! ४
सांज-सकाळीं, दिवसा-रात्रीं
मीलन-आशा फुलते गात्रीं
विजयी होऊन येशील खात्रीं
पराक्रमाची शर्थ करोनी कर शत्रूवर मात !! ५
विश्वशांतिचे हे संहारक
दानव जणुं हे 'चीन' नि 'पाक'
सीमेवरचे दुष्ट आक्रमक
रणांगणावर ठेंचुन त्यांना दाखव आपुला हात !! ६
नको काळजी करूं प्रियेची
चाड बाळगून मात्रभूमिची
लाज राख मम सौभाग्याची
युगें युगें मी अशीच पाहिन तुझीच राया वाट !! ७

* * *

# २२ – सैनिका हाच तुझा सत्कार !

हाच तुझा सत्कार ! सैनिका ! हाच तुझा सत्कार !!
दास्यपाश खळखळा भंगले
मानवता मंदीर उजळलें
हिंदपुत्र ‘ जयहिंद ’ गर्जले
क्रान्तीचा ललकार ! सैनिका ! हाच तुझा सत्कार !!

सत्य – अहिंसा एका हातीं
‘ संगिन ’ शोभे दुसऱ्या हातीं
रक्तहीन तूं केली क्रान्ती
गर्जंत जयजयकार ! सैनिका ! हाच तुझा सत्कार !!

वारस तूं रे शूर विरांचा
श्रीरामांचा, श्रीशिवबांचा
ध्यास तुला नित जनसेवेचा
प्रामाणिक दिलदार ! सैनिका ! हाच तुझा सत्कार !!

तुझ्या कृपेनें वेळोवेळीं
दुखःमुक्त ही माता झाली
नवी संस्कृती इथें उजळली
उजळित अंधःकार ! सैनिका ! हाच तुझा सत्कार !!

सेवक तूं रे मानवतेचा
रक्षक तूं या स्वातंत्र्याचा
देशभक्त तूं भारतभूचा
शूर – वीर झुंझार ! सैनिका ! हाच तुझा सत्कार !!

★ ★ ★

# २३- अणूयुगांतिल सैनिक आम्हीं !

अणूयुगांतिल सैनिक आम्हीं
तमा न आम्हां अण्वस्त्रांची !
अणुशक्तीवर उभवूं येथें
नवी संस्कृति विश्वशांतिची !!

अणूयुगांतिल सैनिक आम्हीं
जगावेगळी आमुची शस्त्रे !
सत्य – अहिंसा सुमंत्र जपतां
अशक्त होतील ही अण्वस्त्रें !!

अणूयुगांतिल सैनिक आम्हीं
तटस्थ राहूं आम्हीं अविरत !
जग हें सारें मित्र आमुचे
विश्वबंधुता राखूं शाश्वत !!

अणूयुगांतिल सैनिक आम्हीं
कुणा न मानूं शत्रू आमुचें !
सीमेवरच्या आक्रमकांना
शौर्य दाखवूं शिवरायांचे !!

अणूयुगांतील सैनिक आम्हीं
विश्वशांतिचें पाईक राहूं !
पराक्रमाची भगवी – गीता
कुरु क्षेत्रावर वाचुन दावूं !!

अणूयुगांतील सैनिक आम्हीं
हटवूं मागें क्रूर आक्रमण !
चाळिस कोटी कोट उभारुन
स्वातंत्र्याचे करूंच रक्षण !!

# २४ — आठवते

आठवते ती मला अजुनही मंगल संध्याकाळ !!
थकला होता चालुन दिनकर
लाख योजने तोडुनि अंतर
घरी परतला होता नंतर
संध्याराणीसाठीं घेउन इंद्रधनूची माळ !! १

घरीं परतलीं होति पांखरें
गाई-गुरांची अन् खिल्लारें
हंबरली गोठ्यांत वासरें
क्षितिज कडेवर ठेउनि माथा विसावलें आभाळ !! २

नानारंगी चढवुन डगले
मावळतीला मेघहि जमले
रविरांजाचें स्वागत केले
दाहिदिशांनी तदां उधळिले नभांत रंग-गुलाल !! ३

आतुर होउन तेव्हां ठुमकत
क्षितिजाच्या रे उंबरठ्यांत
संध्याराणी आली धावत
पतिराजाला पाहुन दारीं लाजुन झाली लाल !! ४

— तशीच मी त्या संध्याकाळी
बनले भोळी सांज-सावळी
आतुरतेनें वाट पाहिली —
गणवेषांतिल तुला पाहतां भुललें मी तात्काळ !! ५

आक्रमकांशी झुंज देउनी
आघाडीवर विजयी होउनि
वीरचक्र मानाचे मिळवुनि
सजविलेस मम सौभाग्याचें निजरक्तांकित भाळ !! ६



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ... दि:
क्रमांक ... नों दि:

# २५ – गाठ किनारा तुझा !

गाठ किनारा तुझा ! फडकवी तव विजयाची ध्वजा !! ध्रु.

धैर्य-सुकाणू हातीं घेउन
शक्ति युक्तीची वल्हीं मारुन
पराक्रमाचे शीड उभारुन
झर झर जा तूं पुढें नाविका गाठ किनारा तुझा !! १

सत्याचा घे शिडांत वारा
ध्येय ध्रुवाचा पाहुन तारा
बंधुत्त्वाच्या गाठ बंदरां
वल्हव नाखवा तुझा माचवा स्वर्गहि तुजला खुजा !! २

अफाट या संसार सागरीं
महाभयंकर मगरीं-लहरी
तुडवित त्यांना देत ठोकरी
सर सर जा तूं कापित पाणी देत शत्रुंना सजा !! ३

सुटेल वादळ-वारा भेसुर
उफाळेल जरि संकट-सागर
धीरानें कर अखंड संगर
जिंकुन घे तूं सौख्य आपुलें दुःख होऊं दे वजा !! ४

तुझी तांडिला विशाल छाती
सैनिक-साथी चाळीस कोटी
आक्रमकांना देतील माती
स्वातंत्र्याचें करूनी रक्षण फडकव विजय-ध्वजा !! ५

★ ★ ★

 – बाळ कासेगांवकर

# २६- माझा मराठ्यांचा देश !

माझा मराठ्यांचा देश – महाराष्ट्र नांव त्याचें
फडकतो ध्वज येथें – क्षात्रतेजाचें शौर्याचें !!
माझा मराठ्यांचा देश – आहे जुना पुरातन
विठूराया विटेवरी – उभा इथे चिरंतन !!
माझा मराठ्यांचा देश – असे सव्वीस जिल्हयांचा
पुरंदर, 'शिवनेरी' – 'सिंहगड' या किल्ल्यांचा !!
माझा मराठ्यांचा देश – राजधानी मुंबापुरी
इंद्रपुरीसम शोभे – इथें उद्यम नगरी !!
माझा मराठ्यांचा देश – गोदा, कृष्णा, कोयनेचा
समृद्धीनें सजविती – ग्रंथ इथें जीवनाचा !!
माझा मराठ्यांचा देश – दारीं उभा सह्यगिरी
येतां संकट बोलावी – भाऊ त्याचा हिमगिरी !!
माझा मराठ्यांचा देश – तीर्थक्षेत्रांचा पावन
जन्मतात जिथें राम – दुष्ट नाशाया रावण !!
माझा मराठ्याचा देश – तुकाराम, ज्ञानेशाचा
रामदास एकनाथ – 'चोखा,' 'नामा,' 'गोरोबाचा' !!
माझा मराठ्यांचा देश – जिजाऊं, जनाई, माता
पावन चरणीं ज्यांच्या – नम्र होई माथा–माथा !!
माझा मराठ्यांचा देश - 'शिवरायांचें' हें दान
भारतीय स्वातंत्र्याचे – ज्यांनी बांधिलें तोरण !!
माझा मराठ्याचा देश – कर्मवीरांचा, फुल्यांचा
बाजीराव, 'बाजीप्रभू' – 'बाबू गेनू' हुतात्म्यांचा !!
माझा मराठ्यांचा देश – थोर थोर सारस्वत
खांडेकर, साने आदि - साहित्यिक प्रज्ञावंत !!
माझा मराठ्यांचा देश - 'बलवन्त,' भाग्यवन्त
घरोघरीं जन्मतांत - असे थोर यशवंत !!
माझा मराठ्यांचा देश – नररत्नांचीच खाण
कीर्ती वैभवाला येथें – नाही तीळभर वाण !!
माझा मराठ्यांचा देश-- जरी असा साधाभोळा
इथें सदा फुललेला - भावभक्तीचाच मळा !!
माझा मराठ्यांचा देश – घडवील संक्रमण
गाजवुन पराक्रम - हटवील आक्रमण !!

# २७ – सह्याद्रीचे सुळे

महाराष्ट्राच्या मर्द मराठ्या शूर वीर फाकड्या !
गर्जत ' हर हर महादेव ' तूं घेतल्यास रणि उड्या !!
कडे-कपारीं तुडवित चढला सह्याद्रीच्या कटी
गडागडावर तदा गाजल्या शौर्याच्या नौबती !

ढाल तुझी, तरवार तुझी रे खणखणली या इथें
धारातीर्थी देह अर्पुनी अमर राहिला इथें !

इतिहासाच्या पानोपानीं शौर्य तुझे रंगलें
भारतभूच्या रणारणांतुन रक्तांकित झालें !

देशभक्तिचे तूंच जगाला दिलेस उज्वल धडे
तुला पाहतां आक्रमकांच्या अंतरांत धडधडे !

सह्याद्रीच्या खांद्यावरचे अवघड गड त्या दरी
तुला पाहतां थरथर कापत, शत्रूही संगरीं !

त्यागाचें अन् शौर्याचें तूं प्रतीक या भूवरीं
फडकविले तूं निशाण भगवें अखंड वाऱ्यावरी !

धन्य मराठी ! जिथें प्रसवली नररत्नें भारती
महाराष्ट्र तूं धन्य ! तुझें तें शूर-वीर भूपती !

★ ★ ★

तेच मराठे आम्हीं ! आम्हीं या सह्याद्रीचे सुळे
शिवरायांचे रक्त आमुच्या शरिरांतुन सळसळें !

हिमाचलावर धावुन आली चीन-पाकची दलें
हटवूं मागे त्या आसुरांना आपल्या बाहूबलें !

आग ओकुनी जरी पेटविले शांतीचें बर्फ
निज रुधिरानें विझवूं आम्हीं ठेंचुनी हे सर्प !

मराठपण तें जगवायाला आम्हां जागृती नवी
काळ बदलला तरि न बदलती कर्तव्यें मानवी !!

★ ★ ★

# २८ – " तुका झालासे कळस "

'ज्ञानदेव' झाला पाया – 'तुका' झालासे कळस
मानवता - मंदीर हें – तेव्हां आलें पूर्णत्वास !

'एकनाथ' कावडीनें – पाणी आणी तातडीनें
केला चिखल चांगला – तेव्हां 'गोरा' -कुंभाराने !

मीरा, मुक्ता, कान्होपात्रा – राधा अनयाची थोर
उभ्या राहिल्या या भिंतीं – साकाराया तें मंदीर !

रामदास, कूर्मदास, - नामदेव, 'पुडलीक'
हेंच मंदिराचे स्तंभ – दिव्य भव्य अलौकीक !!

संत सखू, 'शबरी' ती – चांगुणा नि तारामती
याच थोर तुळयांनी – खंत निवारिली अंती !

नरहरी सोनारानें – सोनियाची केली कौलें
अप्रतीम कौशल्यानें – मंदीर तें मढविलें !

स्वर्णकांतीनें झळाळे – वरी 'तुकोबा' कळस
जनाबाईच्या भक्तीची – डोले अंगणीं तुळस !

सावंता माळयाची बाग – खुलतसे भोंवताली
ठायीं ठायी विखुरल्या – भावभक्तिच्याच वेली !

सेना न्हावी, चोखामेळा – दारीं उभे देवडीला
गर्जतात हरी–नामा – श्रवणी ये वेळोवेळां !

थोर संत - महंतांनी – जाळीला देहाचा धूप
देशभक्त, हुतात्म्यांनी – उभविले धर्म-स्तूप !

बापूजींची प्राणज्योत – तेवतसें गाभाऱ्यांत
सत्य - अहिंसा तेजानें – मार्ग दावी अंधारांत !

दिव्य जवाहर ज्योत – दीपमाळा पाजळिते
मानवता मंदिराचा – कळकण उजळिते !!

卐 卐 卐

# २९ – उभवी नवें महाल

○ ○ ○

भारता ! भाग्याचें तव भाल !
भारता ! उज्वल भावी काळ !! ध्रृ.

दास्याच्या रे घनतिमिरांतुनी
रखडत रखडत मुक्त होऊ नी
स्वातंत्र्याच्या व सिंहासनीं
विराजला तूं काल ! भारता ... !! १

अरूण यशाची रक्तिमवर्णी
विभवाची तव प्रभा सुवर्णी
दिव्य दीप्तिनें जाईल खुलुनी
होईल दृष्टी विशाल ! भारता ... !! २

शांति–सुखाची प्रतिमा मंगल
नयना पुढतीं अखंड राहिल
आणि यशाचे ‘ पवाड ’ गातिल
देव, दैत्य अन् काल ! भारता ... !! ३

आकाशांतिल श्वेत ढगांची
व्यर्थ गर्जना भीषणतेची
विरूनी जाईल रे कायमची
येईल वर्षाकाल ! भारता ... !! ४

उभविल्यास तूं उंच हवेल्या
आक्रमकांनी परि कोसळल्या,
रक्षुनि आपुल्या सीमा सगळ्या
उभवी नवे महाल ! भारता ... !! ५

★ ★ ★

# ३० – एक काळ असला होता !

गतकालिन वैभव आपुलें – जगताला मोहविणारें
जग असतां अंधारांत – क्षितिजांना उजळविणारें !
डौलानें त्या तिमिरांत – ताऱ्यासम चमचमणारें !
ते पूर्वज आमुचे ज्ञानी – शौर्याच्या मंगल खाणी
पुण्यशील अमृत - वाणी
रोमांच उठती आठवतां – एक काळ असला होता !! १

तो छत्रपती शिवराणा – चहुंमुलुखी ज्याचा डंका !
धैर्याचा मेरू होता   शौर्याची नव्हती शंका !
कोणाची छाती नव्हती – द्यावयास त्याला धोका
दिल्लीचा 'फेटेवाला' – 'अफगाणी काबुलवाला'
सुरतेचा टोपीवाला
सर्वांस दरारा होता – एक काळ असला होता !! २

निजराष्ट्रावरती कधिही - येतील संकटे जेव्हां
भेदभाव विसरूनि सारें – रणि झाले एकच तेव्हां
ऐक्याची कळली होती – 'मावळला' महतो तेव्हां
त्या भगव्या झेंडयाखाली – एकत्रित सेना झाली
सोडून सुखें मखमाली
रिपु चिरले हां हां म्हणतां – एक काळ असला होता !! ३

या भारत मातेसाठीं – समशेर करीं धरणारे
स्वातंत्र्य रक्षणासाठीं – छातिचे कोट करणारे
विजयश्री वरण्यासाठीं – मृत्युला हांक देणारे
काळाचे कट्टर वैरी - सद्धर्मशील कैवारी
शांतीचे वंद्य पुजारी
फुरफुरती बाहु आठवतां – एक काळ असला होता !! ४

या माझ्या भारतभूची – नटलेली होती सृष्टी
अविरत त्या विभवावरती – सौख्याची झाली वृष्टी
त्या परकिय आक्रमकांची – म्हणुनीच वाकडी दृष्टी
जागे व्हा नव तरुणांनो – या भारतीय वीरांनो
यशवन्त – शांतिदूतांनो
द्या धडा चीनला आतां – एक काळ असला होता !! ५

* * *

स्वातंत्र्य दिनानिमित्त -

# ३१ - आज....?

सरली भीषण रात उगवला भाग्यरवि डौलांत !
क्षितिजावरुनी स्वैर चालली किरणांची बरसांत !! ध्रु.

अरुण - उषेचा विवाह झाला
रात्रीचा तो अमल संपला
विजयानंदे भारत फुलला
आणि ढगावर आज तिरंगी फडफडले गगनांत !! १

रातकिड्यांची सरली किरकिर
दिवाभितांचे नुरले बेसुर
गाऊं लागले विहंग सुस्वर
झडूं लागले दूर चौघडे देवांच्या दारांत !! २

हिमालयाची उन्नत शिखरें
खेडीं - पाडीं, नगर - गोपुरें
दुमदुमली अन् जयजयकारें
धवल - यशाचे घोष घेउनी विहरें भिरभिर वात !! ३

नांगरलेल्या शेतामधुनी
कोंब कोंवळे शिर उंचाउनी
बघती ओळी ओळी मधुनी
सृष्टिदेविनें जणुं लिहिलेलें काव्य इथें, साक्षात !! ४

फुललीं कापुस - बोंडें रानीं
हंसली सुमनें, कळ्या उमलुनी
अनुपम त्यांची कांती बघुनी
झरझर लपल्या लाजून तारा गगनाच्या बुरख्यांत !! ५

★ ★ ★

दास्य पुरातन आज संपलें
हास्य मनोरम भूवर आलें
सुख शांतीचे अमृत झरलें
स्वातंत्र्याचें बाळ जन्मलें क्रान्तीच्या गर्भांत !! ६

卐 卐 卐

- बाळ कासेगांवकर

# ३२ – युगंधर

卐 卐 卐

थोर युगंधर ! वीर धुरंधर ! हीच तुझी धारणा !
कोटि करांची तुला महात्म्या घेई मानवंदना !!

' शांतिदूत ' तूं या विश्वाचा
देवदूत तूं जणुं स्वर्गीचा
अकरावा अवतार विष्णुचा
दुष्टांचे निर्दालन व्हावे हीच तुझी भावना !!

विश्वाचा तूं भाग्य विधाता
विश्ववंद्य तूं उज्वल नेता
दीनांचा तू प्रेमळ त्राता
निर्मुनिया ' आनंद भुवन ' तूं दिलिस रे प्रेरणा !!

शूर वीर तूं ! तूं मृत्युंजय
थोर युगंधर तूं तेजोमय
काळावरती मिळविलास जय
विश्वाचा इतिहास घडवुनि दिलीस नव-घोषणा !!

★ ★ ★

तुझ्या वियोगें भारतमाता
टाहो फोडुनि रडते आतां
कुणी न उरला आतां त्राता
" हिरा ' जवाहर ' चोरीलास तूं ! कां देवा वंचना ?

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नोंद दि ............

कै. पूज्य पंडित जवाहरलालजींना वाहिलेली श्रद्धांजलि-

# ३३ ~ ग्रहमालेंतुन चंद्र निखळला !

भारतभूच्या कंठ्यामधला आज हरपला हिरा !
ग्रहमालेंतुन चंद्र निखळला ! अश्रु ढाळिते धरा !! ध्रृ.
अवतरला जणुं जगिं परमात्मा
शांतविण्यास्तव आत्मा आत्मा
आज अचानक बनुनि हुतात्मा
देवदूत हा आज परतला स्वर्गी आपुल्या घरां !! १
भाग्यविधाता भारतभूचा
शिल्पकार हा स्वातंत्र्याचा
शांतिदूत हा सर्व जगाचा
भूगोलाच्या पायामधला आज निखळला चिरा !! २
विध्वंसक त्या विज्ञानाला
प्रलयंकारी अण्वस्त्राला
शांतीसाठीं राबविण्याला
समाजवादासाठीं झटला नरशार्दुल हा खरा !! ३
या जनतेच्या मनामनांतुन
मानवतेच्या ज्योती उजळुन
समानतेचीं बीजें पेरुन
विश्वाच्या कोंदणीं तळपला शांतिसूर्य हांसरा !! ४
पुत्र वियोगें भारत माता
टाहो फोडूनि रडतें आतां
निष्ठुर होऊन कसा अनंता
नेसी माझा बाळ हिरावुन अवचित आपुल्या घरां !! ५
तुझ्या घरीं जरि याची वस्ती
दे आत्म्याला देवा शांती
अखिल जगाची हीच विनंती
कोटिकरांनी वाहियली ही श्रद्धा क्रान्तीवीरां !! ३

० ० ०

# ३४ – आम्हीं कृष्णामाईची लेकरं !

कृष्णामाईची आम्हीं लेकरं ! रानीवनींची जशी पांखरं !! ध्रृ.

दुथडी भरून वाहते माई
माणिक-मोत्यांच्या फुलवित राई !
पांचूंचं शिवार हंसतय् गालांत
डुलतंय् वाऱ्यांनं गाण्याच्या तालांत ! वैभवानं नटलंय 'कृष्णेचं खोरं' !! १

सळसळतो कसा 'उसाचा' मळा
'हळद' ल्यालिया पिवळी सोनसळा !
शेताशेतांतुन मोत्यांचीं कणसं
झाडाझाडाखाली इसावल्यात माणसं ! वरकड हिंडत्यात बांधाला ढोरं !! २

पल्याडल्या शेतांत फुललाय 'भुईभूग'
तरारून उठलाय 'धना' न् 'मूग' !
आल्याडल्या तुकडयांत ठिसाकतीय् 'मिरची'
'कांद्यांनं रोखलीय् नळयांची बर्ची ! न्याहरीला बसल्यात गुराखी पोरं !! ३

कांदं, वांगी, तसं बटाटं, मुळं
गाजराला पीक झडलंय् खुळं !
'मकंनं' घातल्यात मानकाच सर
'तंबाखुला' तर भारीच दर ! भाजीपाल्यानं भरल्यात हारं !! ४

वस्तीवर मांडवांत 'हौशा' न् 'सर्ज्या'–
मळयांत राबतुया रानचा राजा !
मोत्यांची रास मळून 'खळयांत'
खंडयांनी मोजून आनतुया घरांत ! धान्यानं ठेसून भरल्यात घरं !! ५

साधी भोळी आम्हीं अडाणी माणसं
खंडयानी पिकवूं मोत्यांची कणसं !
रातदिवस राबून उत्पन्न वाढवूं
स्वतःच्या पायावर आम्हीं उभे राहूं ! देशाला देऊं धान्य हचे सारं !! ६

शूरपुत्र आम्ही शिवरायाचे
संरक्षक या स्वातंत्र्याचे !
तळहातावर शीर घेउनी
सीमेवरती जाऊं धाऊनी ! आक्रमकांना ठेचुन जाऊं म्होरं !! ७

★ ★ ★

– बाळ कासेगांवकर.

# ३५ – जय जय गौरीशंकर !

जय जय गौरी-शंकर ! विश्वंभर ! प्रलयंकर !
जय जय हर ! जय शंकर !! धृ.

सार्वभौम तव भारत – विश्वाचा शांतिदूत
आज पडे संकटांत – तूंच आतां तारणार !!

हे ' पिवळे दैत्य ' चिनी – पथ चुकले आक्रमणी
लावाया परतवुनी – वर देई गिरजावर !!

फाडुनिया ' पंचशील ' – पेटवि हा दावानल
धडधडला हिमशैल – रुधिरानें विझविणार !!

मित्र ज्यास मानियला – वैरभाव त्या रुचला
दुष्ट-भाव त्या सुचला – सीमेवरी करी संगर !!

पेटवुनी शांत बर्फ – नाचतसे ' चीन-दर्प '
पिसाटला ' लाल सर्प ' – वीष जगीं पेरणार !!

शूर वीर पराक्रमी – सह्याद्री-पुत्र आम्हीं
शिवबासम संग्रामीं – गनिमाना कापणार !!

तटस्थता जरि धोरण – संरक्षण परि कारण
विश्वशांतिचे तोरण – लढत आम्हीं बांधणार !!

तळहाती शीर धरूं – ' हिम '–रक्षण सतत करूं
जिंकूं वा हंसत मरूं – होऊं जगीं मरुनि अमर !!

डमडमुंदे तव डमरू – कर तांडव परत सुरूं
रौद्ररूप हंसत वरूं – जाळाया नरकासुर !!

★ ★ ★

छे ! नकोच तें युद्ध – शापिल जगतास बद्ध
दुष्ट मनें करूनी शुद्ध – सत्यम् शिव-सुंदर कर !!

दे अशीच सद्बुद्धी – ' माओची ' कर शुद्धी
शांतीची शुभ नांदी – घुमवूं दे अवनीवर !!

# ३६ – ‘सह्याद्री’ माझा !

○ ○ ○

सह्याद्री माझा ! गर्जा ! सह्याद्री माझा !!
हिमालयाची हांक ऐकुनी उठला हा झुंझार
शिवरायांची आण घेउनी गर्जत जयजयकार
आक्रमकांच्या छातीवरती करण्या वज्र प्रहार
यवनांच्या संहारा सजला जणुं हा शिवराजा !!

पोलादी मनगटें, पहाडी–अभेद्य अन् छाती
श्रीकृष्णाचें चक्र सुदर्शन-संहारक हातीं
‘लाल-चीन’ ठेचून संगरीं चाराया माती
हुकुमशहांना, आक्रमकांना गाडील हा सर्ज्या !!

जरी चिन्यांच्या मुखांत अविरत शांतिसूर्य-बुद्ध
विश्वशांतिचे विध्वंसक हें चालविती युद्ध
क्रूरपणानें आक्रमिली जरि ‘मॅक्मोहन’ हद्द
क्षात्रतेज हें महाराष्ट्राचें जाळील लाल-ध्वजा !!

हिमाचलावर पेटविले जरि शांतीचे बर्फ
‘यमुने’ वरती धावुनि येती जरि ‘पिवळे सर्प’
ठेंचुनि नकटे नाक तयांचें उतराया दर्प–
“ कृष्णच आम्हीं देऊं त्यांना मरणाचीच सजा !! ”

आज सज्ज हे आघाडीवर आमुचें ‘यशवंत’
भाग्यवन्त हें सह्याद्रीचे शूर–वीर–पुत्र
मर्द मराठा शिवबांचे हें पराक्रमी रक्त
आक्रमकांना जिंकुन अंतीं तोषवितील प्रजा !!

★ ★ ★

# ३७ – तुझी शपथ आई ऽ !

● ● ●

तुझी शपथ आई ऽ ! उद्यां मी होईन शूर शिपाई !!

मी शिवबा तूं जिजाऊ आई
कर्णार्जुन मी कुंती तूंही
तूंच यशोदा, मुरलीधर मी
तुझी शपथ आई ! शत्रुला भिणार मी नाही !!

स्वातंत्र्याचा मी संरक्षक
भारत मातेचा मी पाईक
बालचमूचा बनुनी नायक
तुझी शपथ आई ! उद्यांचा वैमानिक मीही !!

जसा तुझा मी बाळ लाडका
तसाच भारतभूचा बरंकां
मला हिमालय मारी हांका
तुझी शपथ आई ! उद्यां मी जिंकणार लढाई !!

असो चिनी वा पाकिस्तानी
कुणीहि आक्रमक वा सैतानी
ठेचाया सीमेवर जाऊनी
तुझी शपथ आई ! उद्यां मी करिन अशी लढाई !!

* * *

# ३८ – शिवनेरी किल्यांत ... !

★ ★ ★

शिवनेरी किल्यांत !
मूर्तिमंत जणुं शौर्य जन्मलें क्रांतिच्या गर्भात !! ध्रृ.

शिवाईचें वरदान लाभलें
शिवराजे जन्माला आलें
इतिहासांचें पान उलटलें
तिमिराला उजळीत जसा ये रविराजा गगनांत !! १

सैन्य जमविलें शूर मावळी
संघटना जनतेची केली
सद्धर्माची धुरा वाहिली
दुःख, दैन्य, दारिद्रय, दास्यही निवारिले देशांत !! २

भ्याडासम कां बांधव आपुले
परसत्तेचें गुलाम बनले
शिवरायाला नवल वाटले
महाराष्ट्र हा जागा केला उडवुन सारी भ्रान्त !! ३

सत्ताविस किल्लयावर चढला
भगवा झेंडा स्वैर फडकला
यवनांचा पण माज उतरला
रक्त पाजुनि तृषा धरेची केली त्यांनी शांत !! ४

अनाद्य, शाश्वत, अनंत, पावन
क्षात्रतेज हे महा-विलक्षण
तयांचेच ना वंशज आपण ?
तेंच शौर्य का निष्प्रभ होऊन बसले आज निवांत ? ५

★ ★ ★

तोच नव्हे कां हा शिवनेरी ?
कुठें निमाल्या त्या रणभेरी ?
गतःस्मृती त्या धरुनिया उरीं
मीच एकला महाराष्ट्रभरफिरतो होउन भाट !! ६

# ३१ – आई! सैनिक मी होणार !

आई ! सैनिक मी होणार !
चीन असो वा कुणिहि आक्रमक ठार त्यास करणार !!
नको मला तो रबरी चेंडू
नको विटी अन् नकोच दांडू
लुटूपुटूची बंदुक टाकुन ' संगीन ' मी घेणार !!
नकोत ती रंगीत खेळणीं
नकोच देऊं खेळ आणुनीं
मला हवी शिवबांची मूर्ती आणि ढाल-तरवार !!
नकोत मजला कपडे भारी
खादीवर मम मर्जी सारी
थोर थोर यशवंत, जवाहर मीही उद्या होणार !!
संकट आलें स्वातंत्र्यावर
धावुन आतां आघाडीवर
बालविरांचे सैन्य जमवुनी धडक मीच देणार !!
शांतीचा मी जरी पुजारी
तटस्थतेचें धोरण मम जरी
मातेवरती संकट येतां बनेन रण झुंझार !!

★ ★ ★

नकोच केवळ ज्ञान पुस्तकी
शिक्षण घ्याया हवें सैनिकी
नव्या पिढीचा नवा शिपाई, संरक्षक बनणार !!

○ ○ ○

# ४० – जय जवान ! जय किसान !

॥ जय जवान ! जय किसान ॥ !
एक महात्मा देऊनि गेला भारतभूला मंत्र महान !!

अखिल जगाच्या शांतीसाठीं
'महाबळी' गाडायासाठीं
अवतरली जणुं वामन-मूर्ती
हिमालयासम ज्याची कीर्ति, मूर्ती होती जरी लहान !!

अभंग याची ध्येयासक्ती
निजराष्ट्रावर निस्सिम भक्ती
अजोड याचा त्याग नि नीती
भारतभूवर निर्मुन गेला जणुं विश्वाचें शांतीस्थान !!

आक्रमकांना हटवायाला
अर्जुन बनुनी रणीं उतरला
कुरुक्षेत्रावर अजिक्य ठरला
राष्ट्ररक्षणासाठीं यानें करीं घेतलें दिव्य कृपाण !!

अखिल जगाच्या शांतीसाठीं
शत्रूच्याही मैत्रीसाठीं
बंधुत्त्वाची जोडुन नातीं
धन्य जाहला शांतिदूत हा निजप्राणाचें देउनि दान !!

अमर जगीं 'ताश्कंद' बनविलें
सुवर्णाक्षरांनीं तें लिहिलें
नवें शांति-युग इथें घडविलें
थोर युगंधर ! वीर-धुरंधर ! यास जगाचे लाख प्रणाम !!

* * *

असामान्य हा सामान्यांचा
उज्वल नेता हा दलितांचा
प्रधान-मंत्री नव्या जगाचा
लहानमूर्ती महान कीर्ती पाहुन अविरत लवेल मान !!

 – बाळ कासेगांवकर

# ४१ – ज्ञानराज माऊली !

माते इंद्रायणी ! 'ज्ञानिया' पुत्र तुझा सद्‌गुणी !!
वेंचुनि निज पावन – जलबिंदू
निर्मिलास ज्ञानाचा सिंधू
जिवन – कलहातुनी ! उजळला धर्मदीप भुवनीं !!
कैवल्याचा जीवंत पुतळा
चैतन्याचा अमर जिव्हाळा
दिलास तूं घडवुनी ! तयाची तूंच धन्य जननी !!
सुवर्ण – पिंपळ ज्याच्या द्वारीं
रेडा बोले वेदहि चारी
चकित होउनीं मनीं ! बैसले ब्रह्मादिक लाजुनी !!
जयें सजविला नव – सारस्वत
दुरितांचे नित् तिमिर निवारित
वाग्युद्धाच्या रणीं ! झुंजला पांखंडी जिंकुनी !!
गीतार्थाला बनवुन प्राकृत
अमृतास पैजेनें जिंकित
नवरस नित पाजुनी ! बनविलें अमर संत जीवनीं !!
साहित्याच्या सुवर्ण – खाणी
उघडुनि भारतभूच्या 'क्षोणीं'
विश्वाच्या अंगणीं ! लाविल्यां वाङ्‌मयवल्ली गुणी !!
'मराठिची' ही सजवुन नगरी
मांडुनि विश्वाच्या बाजारी
ज्ञानाच्या पूजनीं ! रंगला वग्यज्ञां बैसुनी !!
'भागवताचा' भगवा झेंडा
फडकत सांगे आज त्रिखंडा
'ज्ञानराज – माऊलीं !' घुमूं द्या घोष सदा गगनीं !!
रचिला यानें भक्कम पाया
कळस जाहला वरती 'तुकया'
"ज्ञानेश्वर – माऊली, तुकाराम !" अमर जाहले जनीं !!
इंद्रायणि ! तव सुपुत्र ज्ञानी
कसा वर्णू ! मम लहान वाणीं
दोन्ही कर जोडुनीं ! ठेवितो मस्तक तत् चरणीं !!

* * *

 – बाळ कासेगांवकर

दा. क. ९५५६०

## ४२ शबरी

झाली सोन्याची झोपडी – उजळला भाग्य चंद्र
माझ्या पूर्व पुण्याईनें – घरा आले 'रामचंद्र' !

जातीची हो भिल्लीण मी – अमंगळ माझी काया
माझ्यासाठीं शिणलात – किती तुम्हीं देवराया !

लाजविलें मला तुम्हीं – येथें येऊन 'राघवा'
आयोध्येच्या राजेश्वरां – मानुनी घ्या गोड सेवा !

आवडतील रे कशी – माझी उष्टी बोरें तुला
एक एक फलग्रास – आहे चाखून पाहिला !

तुझ्यासाठीं गोळा केली – गोड बोरें वनांतुनी
कशी आणीन मी देवा – बोरें वाईट वेंचुनी !

आणूं कोठून राघवा – तुझ्यासाठीं सिंहासन ?
जीर्ण झाल्या लक्तरांचे – देतें तुला मी आसन !

आणूं कोठलें जेवाया – पंचपक्वान्नाचें ताट ?
ओवाळाया नाही घरीं – पंचारती, फूल, वात !

भाग्यवान केवढी मी – देवा तुझी पुजारीण
तुझें लाभतां चरण – झाले पतीत – पावन !

कां रे देवा थांबलास – बोरें चाखतां चाखतां ?
जानकीच्या प्राणेश्वरा – झाली जन्माची सांगता !!

★ ★ ★

## ४३ जगायचें आहे पण!

तुझा प्रकाश भास्करा – देई जगाला जीवन
जगवितो जीवन मी – आत्मज्योत पाजळून !

प्रकाशाचा नाही स्रोत – मला ठाऊक जीवनी
अंध झालो कसा देवा – असोनिया डोळे दोन्ही !

तुझ्या प्रकाशें उजळे – जग - जीवनाचा पथ
ओढितो मी अंधारांत – माझा संसाराचा रथ !

भंगलेला रथ माझा – चाकें झाली खिळखिळी
खाच खळग्यांच्या मार्गी – पथ चुके वेळोवेळीं !

याच अंधाराचा साज – हेंच माझें कां प्राक्तन
ठेचाळतो घडोघडी – व्याकुळले पंचप्राण !

तुझ्या प्रकाशाचा लाभ – कधीं व्हायचा रे मला
विटलें रे मन माझें – भेसूर या अंधाराला !

तुझ्या प्रकाशांत मला – दिसावी रे माझी छाया
उजळून काढ आतां – माझी अंधाराची काया !

हाच काळोख भास्करा – मरूं घाली जीविताला
जगायचें आहे पण – तुझ्या प्रकाशांत मला ! !

★

– बाळ कासेगांवकर

# ४४- शिल्पकार -

शिल्पकार तूं थोर खरोखर !!
पाषाणांची रास सभोती
अंधःराच्या भंवतीं भिंती
ज्ञानाच्या पण उजळून ज्योती – तुझें चालले कार्य निरंतर !!
नवसंस्कृतिची टाकी हातीं
घाव तुझे सद्‌भाव घालिती
स्वच्छंदें पाषाण फोडिती – तयार होती मूर्ति भराभर !!
शूर-वीर अन् संत, महात्मे,
महान नेते, वंद्य हूतात्मे
थोर युगंधर, दृष्टे मोठे – आकाराला येति मनोहर !!
उभविलेस प्रासाद भूवनीं
कोरिलीस तूं सुंदर लेणीं
निर्मिल्यास शिल्पांच्या खाणी – सजविलेस मानवता-मंदिर !!
अनाद्य, शाश्वत, अनंत, पावन–
तुझ्या कलेचें वैभव अनुपम
फुलविलेस तूं मानव-जीवन – यज्ञ तुझा चालला निरंतर !!
वंशज तूं तर 'सांदिपनीचा'
थोर पुत्र तूं 'बृहस्पतींचा'
भाग्यविधाता तूंच जगाचा – ब्रह्मा, विष्णू, महेश तूं तर !!
कलावंत तूं जगावेगळा
उपमा देऊं कोणती तुला ?
अगम्य तव या महानतेला – अमरत्त्वाचें भूषण-अक्षर !!
कला तुझी रे ही जीवनमय
कौशल्यानें साधुन समन्वय
शिल्पसुमें तूं फुलविसी अक्षय – कर्म योग तव खडतर, सुंदर !!

– बाळ कासेगांवकर.

# ४५ – कोण उद्याचें भविष्य लिहितो ?–

कोण उद्याचें भविष्य लिहितो ? –
आकाशाच्या नील-पटावर !
ग्रहताऱ्यांचें अक्षर करुनी –
अढळ, अटळ, कल्पान्ती सुंदर !! १

कोण उद्याचें भविष्य लिहितो ? –
विशाल विश्वाच्या भाळांवर !
धूमकेतुचें पीस घेउनी –
शब्द लिहितसे कोरून भरभर!! २

★

कोण उद्याचें भविष्य लिहितो ? –
विश्वाच्या कोऱ्या हातावर !
नव-रेषांचे गुंफुनि जाळे –
विश्व नाचवी त्या सूत्रावर !! ३

★

कोण उद्याचें भविष्य लिहितो ? –
ग्रहताऱ्यांचें फिरवुन मंडल ! –
विश्वाच्या बारा राशींतुन –
घडवितसे हा अनिष्ट, मंगल !! ४

★

कोण उद्याचें भविष्य लिहितो ? –
मानवतेच्या मंगल भाळीं !
नशिबाला मग बोल लावुनी –
कोणी करतो कृत्यें काळीं !! ५

★

कोण उद्याचें भविष्य लिहितो ? –
आकळे न मज किमया लीला !
त्याच्या भाळी कोणी लिहिली –
रिकामीच ही कटकट बोला !! ६

★

# ४६ – इंद्रायणीस....!

माते इंद्रायणी ! वाहसी मर्द मावळांतुनी !!
शिवकालिन ते शूर मावळे
कुशींत तुझिया जन्मा आले
सद्धर्माचे पालन केले
रक्त सांडुनी रणीं! जाहले अमर कृतीनें जनीं !! १
आदिकवी जो महाराष्ट्राचा
पाया जो प्राकृत भाषेचा
थोर पुत्र तो तुझ्या कुशीचा
ज्ञानेश्वर सद्गुणीं ! आगळा अवघ्या संताहुनी !! २
तुझ्याच मंगल पंचक्रोशितुन
सृष्टिदेविचें वैभव अनुपम
वैदिक धर्माचें संकीर्तन
मंगल तव अंगणीं ! – उजळले धर्म-दीप भुवनीं !! ३
बुद्धांची ती सुंदर लेणीं
'भामचंद्र' 'भंडाऱ्या' गिरितुन
रत्नासम चमचमतीं अजुनी
विहार, गुंफांतुनी ! धन्य तूं त्यांची गे जननीं !! ४
त्याच तुझ्या गे कुशींत मंगल
'देहूक्षेत्र' हें बनलें राऊळ
कृपाछत्र तें ज्याचें शीतल
'तुकाराम' बहुगुणी ! बैसला 'अभंग' मुखि जाउनी !! ५
अमर जयाचें 'अभंग' झाले
मानवास बोधामृत दिधले
जगास तारुन आपण तरले
जीवन कलहांतुनी ! पाजली आम्हांस संजीवनी !! ६
उभविलेस धर्माचें मंदिर
पाया रचिला तूं 'ज्ञानेश्वर'
'कळस तुक्याचा' शोभे त्यावर
स्वर्णाच्या कोंदणीं ! जडविले तूं रत्नांचे मणी !! ७
महाराष्ट्राची सरस्वती तूं
संतांची माऊली थोर तूं
सद्धर्माचा बांधुन सेतू
तुझ्या कृपेनें आम्हीं ! जाऊं भवसागर लंघुनी !! ८

# ४७ – नाही कुणी महान ! –

नाही कुणी महान !
आई ! तुझ्या समान !! ध्रु

भरले जरी जलानें भंवती अनेक सिंधू
मज भासती दंवाचे ते सानसान बिंदू !
असली जरी तयांच्या हृदयांत रत्नखाण ;
नाही कुणी महान !! १

तरांगणीं चमकती ग्रहगोल, दीपमाला
मज काजवेच गमती जरि नाशिती तमाला !
जगजीवनास उजळी तव प्राणज्योत सान !
नाही कुणी महान !! २

नेते कुणी हुतात्मे, ते संत वा महात्मे,
झुंझार, वीर मोठे, शास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ते !
येती तुझ्याच पोटी जन्मास ना अजून !
नाही कुणी महान !! ३

पुष्पांहुनी पवित्र माया तुझीच आई
जे मोल माणिकाला वा अमृतास नाही !
जिंकील स्वर्ग सारा तव धन्य अन्नदान !
नाही कुणी महान !! ४

हृदयीं तुझ्याच वसती ब्रह्मा-महेश-विष्णू
विश्वांत तीन-लोकीं तू एक कामधेनू !
उपमा आतां कशाची देऊ? पडे लहान !
नाही कुणी महान !! ५

आहे अमर्त्य जगतीं वात्सल्य हेंच आई
मोठा अतर्क्य महिमा सीमा तयास नाही
वाणूं किती मुखानं ? वाणी पडे लहान !
नाही कुणी महान !! ६

○ ○ ○

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५६०

# ४८ – स्वातंत्र्याचा गण !

स्वातंत्र्याचा गण आधीं नमूं चला हो ऽऽऽ !!
रक्तहीन घडली क्रान्ती – भारतांत आली शांती !
जनतेची हरली भ्रान्ती – वैभवास चढली कांती–
तुटुनि शृंखला हो ऽऽऽ !! १

सत्य-अहिंसेचा मंत्र – शांतताच आमुचें शस्त्र !
अद्वितीय "चरखा" यंत्र – प्रेमाचे पुरवी वस्त्र !
लढा जिंकला हो ऽऽऽ !! २

स्वराज्य हें आलें आलें – लोकराज्य झालें झालें !
ध्वज तिरंगी फडफडलें – जयघोष जगिं दुमदुमले !
बिगुल फुंकिला हो ऽऽऽ !! ३

अतर्क्य हें अघटित घडलें – हुकुमशहा अंतरिं भ्याले !
शौर्य पश्चिमेला भिडलें – बंधुप्रेम लढतां जडलें !
विश्वशांतिला हो ऽऽऽ !! ४

अणुबाँब, रॉकेटांची – वज्रासम शस्त्रास्त्रांची
तमा नसे आम्हां त्यांची – अहिंसाच शक्ती आमुची –
अतुल आजला हो ऽऽऽ !! ५

○ ○ ○

REFBK-0015560
REFBK-0015560
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ४४०२८ वि: काव्य
क्रमांक १८४८ नों. दि: ५४/५/७८